|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ | अंक : ३८ | सोमवार दि. ०७ सप्टेंबर २०२० ते रविवार दि. १३ सप्टेंबर २०२० | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


# पोलीस अधिक्षक सहीसलामत सटकले
# पालघर हत्याकांडात १८ पोलीस लटकले

पालघर/क्राईम रिपोर्टर

संपूर्ण देशाला हादरवून टाकणाऱ्या पालघर जिल्ह्याच्या गडचिंचले गावातील साधूंच्या तिहेरी हत्याकांड प्रकरणी कासा पोलीस ठाणे आणि पालघर पोलीस मुख्यालयातील १८ पोलीस कर्मचाऱ्यांवर वेगवेगळ्या प्रकारची कारवाई करण्यात आली आहे. पण त्या हत्याकांडाला हे १८ पोलीस कर्मचारीच जबादार आहेत का? यामध्ये पालघरचे तत्कालीन पोलीस अधीक्षक गौरव सिंग आणि त्यांच्या अन्य बड्या सहकारी पोलीस अधिकाऱ्यांची काहीच जबादारी नव्हती का?





तत्कालीन पोलीस अधिक्षक

१६ एप्रिल रोजी रात्री गडचिंचले गावात तिहेरी हत्याकांड घडले होते. पण त्याच्या काही दिवस अगोदर साधू आणि डॉक्टरांच्या वेशात मुले पळवणारी टोळी येणार आहे अशी अफवा या परिसरातील गावांमध्ये पसरली होती आणि या बाबत एका ग्राम पंचायतीने पत्रही पोलिसांना दिले होते. मग या पत्राची जिल्हा पोलीस अधीक्षक गौरव सिंग यांनी आणि त्यांच्या बड्या सहकारी अधिकाऱ्यांनी योग्य दाखल घेतली असती आणि या भागात अफवा पसरवणाऱ्या लोकांवर कारवाई करून या भागातील पोलीस बंदोबस्त वाढवला असता, तर गडचिंचले ...पान ६ वर

## सिध्दवा जायभाये यांची कासा पोलीस ठाण्याच्या प्रभारी पदी संशयास्पद नियुक्ती?

ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत देश हादरवून टाकणारे तिहेरी हत्याकांड घडले आणि तिथल्या प्रभारीना निलंबित करण्यात आले. त्यांच्या जागी एखादा सक्षम अधिकारी नियुक्त करण्याऐवजी पालघर गुन्हे शाखेतील महिला पोलीस अधिकारी सिध्दवा जायभाये यांची तत्कालीन पोलीस अधीक्षकांनी नियुक्ती केली. या नियुक्तीच्या काही महिन्यांपूर्वी सिध्दवा जायभाये यांच्यावर मुंबई अहमदाबाद महामार्गावरील बावखल पेट्रोल पंपाजवळ गोळीबार झाला होता. सुदैवाने त्यातून त्या बचावल्या होत्या. बरे पोलीस दलात त्यांनी असे काय उल्लेखनीय काम केले होते कि त्यांना कासा पोलीस ठाण्यासारख्या दुर्गम, संवेदनशील आणि जंगली परिसर असलेल्या पोलीस ठाण्याचा चार्ज देण्यात आला. तत्कालीन पोलीस अधीक्षक गौरव सिंघ यांच्या खास मर्जीतल्या अधिकारी म्हणूनच त्यांची कासा पोलीस ठाण्यात नियुक्ती करण्यात आलीय आणितेही साधूंच्या हत्याकांडाचा तपास सुरु असताना त्यांची झालेली नियुक्ती हि संशयास्पद असल्याची चर्चा पोलीस दलातच दबक्या आवाजात सुरु आहे.

# बायकोच्या नादाने बहकला राव ‘आई’वर घातले कुऱ्हाडीचे घाव

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर



माणूस आजकाल इतका स्वार्थी झाला आहे कि त्याला रक्ताच्या नात्याचीही चाड राहिलेली नाही. त्यामुळे ज्या आई-वडिलांनी त्याला काबाड कष्ट करून लहानाचे मोठे केले त्यांच्या उपकारांची जाणीव त्याला अजिबात राहिलेली नाही. म्हणूनच एकदा का त्याचे लग्न झाले आणि तो त्याच्या संसारात रमला कि जन्मदात्यांची त्याला अडचण वाटू लागते. त्यामुळे एक तर तो आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवतो किंवा त्यांचा कायमचा काटा काढतो. अशाच एका कृताघ्न मुलाने आईच्या रागाने बायको माहेरी गेली म्हणून चक्क जन्मदात्या आईचीच कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या केली. पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली असून या घटनेने संपूर्ण औरंगाबाद जिल्हा हादरला आहे.

पत्नीसोबत नेहमी भांडण का करते, असे म्हणत ३५ वर्षीय मुलाने ७५ वर्षीय आईच्या डोक्यात कुऱ्हाड घालून खून केल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. या प्रकरणात आरोपी मुलाला गुरुवारी सकाळी आठ वाजता पोलिसांनी अटक केली. त्याची १४ दिवसांसाठी न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्याचे आदेश प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बी. डी. तारे यांनी दिले. रमेश भिकाजी घुगे (मूळ रा. बाळापूर, ता. औरंगाबाद, ह.मु. सुर्या लॉन्समागे), असे आरोपीचे नाव आहे. शशिकलाबाई भिकाजी घुगे, असे मृत आईचे नाव आहे. शशिकलाबाईचा दुसरा मुलगा भाऊसाहेब घुगे (वय ५५) यांच्या तक्रारीवरून चिकलठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपी रमेशची पत्नी व मृत शशिकला यांच्यात छोट्या, मोठ्या कारणावरून नेहमी भांडण होत होते. त्यामुळे रमेशची पत्नी दोन महिन्यांपूर्वी बाळापूर येथून औरंगाबादला राहण्यासाठी गेली. ...पान २ वर

# दारुडा दाजी येडगे संशयाने झाला येडा
# पत्नीच्या रक्ताचा घरातच पाडला सडा



मयत मंगल येडगे

कऱ्हाड/क्राईम रिपोर्टर

माणसाला दारूचे व्यसन लागले कि मग त्याच्या सुखी संसाराला ग्रहण लागते. दारूच्या नशेत पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेण्यापासून ते मुलाबाळांना विनाकारण मारझोड करण्यापर्यंत त्याच्याकडून कुटुंबाचा छळवाद सुरु होतो असा माणूस संपूर्ण कुटुंबासाठी डोकेदुखी ठरलेला असल्याने त्याचा वेळीच इलाज केला नाही तर त्याच्या हातून काहीही घडू शकते. मलकापूर येथील दाजी येडगे याच्या बाबतीतही तसेच झाले. तो दारू पिऊन असाच पत्नीला मारझोड करायचा तिच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा आणि एकेदिवशी त्याने तिचे जमिनीवर डोके आपटून तिला ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

कऱ्हाड जवळील मलकापुर येथील मेन रोडवरील आदिवासी आश्रम शाळेजवळ दाजी येडगे हा पत्नी, मुलासह राहयला आहे. दाजी येडगे याचे गेल्या पंचवीस वर्षापूर्वी मलकापुर येथीलच मंगल सोनके हिच्या बरोबर समाजाच्या रितीरिवाजानुसार लग्न झाले होते. मंगल ही सुशिक्षीत होती. तिचे राहणीमान ही सभ्य होते. लग्नानंतर या दाम्पंत्यांला एक मुलगा आणि तीन मुली. त्यांनी तीनही मुलींचे लग्न करून दिले होते. त्या आपल्या सासरी राहत आहेत. तर मुलगा अनिकेत हा त्याच्या जवळ राहत होता. दाजी येडगे हा एका कारखान्यात कामाला जात होता. त्यावरच त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालत होता. मंगल ही संसाराचा गाडा आपल्या परीने ओढत होती. ...पान २ वर

# पोलिसांनी कौशल्याने लावला हत्याकांडाचा छडा
# एका चीठीच्या पुराव्याने केला चार खुनांचा उलगडा

सातारा/क्राईम रिपोर्टर







विश्वासराव पानिपतच्या लढाईत मारले गेले आणि तेंव्हापासून जेंव्हा केंव्हा विश्वासाच्या गोष्टीवर चर्चा होते तेंव्हा विश्वासरावांचे उदाहरण दिले जाते आणि एक प्रकारे ते खरेच आहे. कारण आजकाल कोणावरही माणसाने सहजासहजी विश्वास टाकू नये. कारण कधी कशी फसवणूक होईल हे सांगता येत नाही आणि नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्यांची संख्या तर दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सातारा जिल्ह्यातील सोमार्डी गावच्या एका महा ठगाने लष्करात नोकरी लावतो असे सांगून चौघांना फसवले. मात्र त्यांनी पैसे परत करण्याचा तगडा लावताच या नराधमाने चक्क त्यांचे मुडदे पाडले आणि दरीत फेकून दिले. मात्र मृतदेहाच्या संगाड्याजवळ सापडलेल्या एका चीठीने या हत्याकांडाचा उलगडा केला आणि आरोपींच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या.

११ ऑगस्ट २०२० रोजी मेढयापासून सुमारे तीन किमी अंतरावर असणाऱ्या भिलार जवळील मार्ली घटातुन जाणाऱ्या येणाऱ्यांना एक उग्र आणि दर्प असा वास येत होता.काही जणांनी याची माहिती मेढा, जावळी पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्यावेळी त्यांना घाटात खोल दरीत एक मानवी सांगडा असल्याचे दिसून आले. पोलीसांनी तातडीने महाबळेश्वर ट्रेकर्सला पाचरण करून तो मानवी सांगडा बाहेर काढून तपासाला सुरूवात केली. त्या मृत सांगडयाजवल पोलीसांना एक हिशोबाची चिठी आणि मोबाईल नंबर असलेला कागद मिळालेला होता. त्यावरून पोलीस तपास करत असताना परत दि,१३ ऑगस्ट रोजी पोलीसांना त्याच घटनास्थळी पुढे काही अंतरावर आणखी एक मानवी सांगडा ...पान २ वर

# चोरी करणाऱ्या नोकराला मालकाने धरले साथीदारांच्या मदतीने त्याला ठार मारले

डोबिंवली/राजेंद्र वेदांते

चोरी कधीच लपत नाही. चोरीचे गुन्हे कधी ना कधी उघडकीला येताच असतात. आजकाल परप्रांतातून मुंबईत कामधंद्यासाठी आलेल्या लोकांना पैशाची खूप हाव असते. अशावेळी जो त्यांना कामधंदा देतो त्याच्याच पैशावर ते डोळा ठेवतात आणि मालकाचा विश्वास घात करतात. पानपट्टीच्या टपरीवर काम करणाऱ्या एका नोकराला मालकाचा विश्वासघात करणे चांगलेच महागात पडले. नोकर गल्ल्यातले पैसे चोरतो हे समजताच मालक चिडला आणि याच रागातून त्याने आपल्या दोन साथीदारांच्या मदतीने चोरी करणाऱ्या नोकराला ठार मारले. या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल होण्याच्या आताच पोलिसांनी दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या, तर तिसरा फरारी आहे.

डोंबिवली पूर्वेतील मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या खुनाचा गुन्हा दाखल होण्यापूर्वीच गुन्हे अन्वेषण विभागावाच्या युनिट ३च्या पथकाने दोन आरोपीच्या मुसक्या आवळल्या असून एक आरोपी फरार झाला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या चौकशीत निष्पन्न झाले आहे. २१ ऑगस्ट रोजी मध्यरात्री एका सहकार्याची हत्या करून मृतदेह गोणीत भरून ...पान २ वर

# तलवारीचा वाद प्राणावर बेतला
# एकाने दुसऱ्याचा जीवच घेतला



मयत नकी खान

मुंबई/एस. कुमार



कोणाच्या डोक्यात काय कल्पना येईल याचा नेम नाही. एका तरुणाला त्याच्या मित्राच्या वाढदिवसाचा केक तलवारीने कापायचा होता तो त्याने कापला. पण ज्याच्या कडून तलवार आणली होती त्याला ती वेळेवर दिली नाही म्हणून याच तलवारीवरून झालेल्या वादात मित्राच्या वाढदिवसाचा केक तलवारीने कापणाऱ्याला तलवार देणाऱ्याने चाकूने भोसकून ठार मारले. इतकेच नव्हे तर त्याच्या मित्रालाही जखमी केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अवघ्या ८ तासात अटक केली आहे.

दि. ३ सप्टेंबर चा दिवस होता. रात्री ची वेळ होती. त्यादिवशी ॲन्टॉप हिल पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक महादेव कोळी हे रात्रपाळीला कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून काम पाहत होते. त्याच वेळी रात्री ८:४५च्या सुमारास सायनच्या लोकमान्य टिळक रुग्णालयातून संदेश प्राप्त झाला की, नकी सईद खान (वय १९) व त्याचा मित्र मुस्तकीम (वय २०) या दोघांवर सारस्वत बैंक, ॲटॉप हिल येथे एका ओळखीच्या इसमाने चाकूने वार केल्याने त्याचा भाऊ हा त्यास उपचारसाठी सायन रुणालय येथे घेवून आला असता नकी खान यास डॉक्टरांनी तपासून रूग्णालयात दाखलपुर्व मयत घोषीत केले असून मुस्तकीम यास रुणालयात दाखल करून उपचार सुरू आहेत. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून व वरिष्ठांच्या निर्देशानुसार ...पान २ वर

# पत्नीच्या जीवनात आला एक यार लेकीच्या मदतीने पतीला केले ठार

नालासोपारा/क्राईम रिपोर्टर

पती पत्नीचे नाते हे एकमेकांवरील विश्वासावर टिकून असते. पण जेंव्हा दोघांपैकी कुणाचा तरी एकाचा पाय घसरतो आणि त्यांच्या संसारात तिसऱ्या कुणाची तरी अनैतिक मार्गाने एन्ट्री होते तेंव्हा त्यांचा संसार तर उध्वस्त होतोच पण त्यातून एकमेकांविषयी इतकी चीड निर्माण होते आणि त्यातून एखाद्याचा जीव ही जातो. नालासोपाऱ्यातील हनुमान नगर येथे अशाच एका घटनेमध्ये पत्नीचे अनैतिक संबंध असल्याने पती पत्नीमध्ये नेहमीच भांडणे व्हायची आणि याच भांडणाला कंटाळून पत्नीने आपल्या मुलीच्या मदतीने पतीच्या पोटात काचेचा तुकडा खुपसून पतीची हत्या केली. या प्रकरणी नालासोपारा पोलिसांनी माय-लेकींना अटक केली आहे.

नालासोपारा पश्चिमेकडील इमारतीमध्ये राहणाऱ्या पत्नीने मुलीसह मिळून फुटलेल्या खिडकीच्या काचेने पतीचा खून केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी रात्री घडली आहे. नालासोपारा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास केल्यावर हे सत्य बाहेर आल्यावर शनिवारी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. नालासोपारा पश्चिमेकडील हनुमान नगरमधील विनी रेसिडन्सी स्पेस २ या इमारतीमध्ये ...पान ६ वर

# कानाखाली मारल्याने संतापाने पेटला
# ‘भाई’ला ठार मारून त्याने सूड घेतला







मयत विलास

जळगाव/प्रतिनिधी

आजकालच्या तरुण पिढीत सळसळत्या रक्तामुळे तारुण्याचा जोश असा काही वाढू लागलाय कि त्यातूनच त्यांच्यात अहंपणा निर्माण झालाय आणि त्याच अहंपणाने त्यांना इतके मुजोर केलेय कि त्यांची पावले भाईगिरीकडे वळायला लागलीत. मग अशा भाईला कुणी काही बोलले किंवा कुणाचा धक्का लागला तर त्याला ते कसे सहन होईल. भुसावळ मधील अशाच एका तरुण भाईला मोटार सायकलचा थोडा धक्का लागला. या कारणावरून त्याने सरळ मोटार सायकलस्वाराच्या कानशिलात लगावली. त्याचाच राग मनात धरून त्या तरुणाने भाईच्या हत्येचा कट आखला आणि मित्रांच्या मदतीने त्या भाईची त्याच्याच घरात घुसून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली असून आजची तरुण पिढी कशा तऱ्हेने आणि कुठल्या दिशेने भरकटत जावून आपलेच नुकसान करून घेत असल्याचे दिसत आहे.

भुसावळ शहरातील श्रीराम नगर भागात दिनकर चौधरी व आशाबाई चौधरी हे दांम्पत्य राहतात. त्यांचा एकुलता एक मुलगा विलास याने बी.ई. मॅकेनिकलचे शिक्षण घेतले होते. विलास सध्या बेरोजगार होता. विलास याच्यावर भुसावळ बाजारपेठ पोलिस स्टेशनला काही गुन्हे दाखल असल्याचे देखील समजते. अंगात सळसळते तरुण रक्त असल्यामुळे विलासच्या अंगी जोश होता. ...पान ६ वर

# दारूड्यांच्या भांडणात विनाकारण फसला मध्यस्थी करणाराच जीव गमावून बसला

बेळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत सल्लाउद्दीन

दारूड्यांच्या भांडणात सहसा कुणी पडू नये. कारण दारूच्या नशेत त्यांच्या हातून काय घडेल याचा नेम नसतो. मात्र काही लोकं केवळ मैत्रीला जागून आपल्या दारुड्या मित्राच्या भानगडीत पडतात आणि त्याची भांडणे सोडवण्याचा प्रयत्न करतात. पण दारूच्या नशेत तर्र असलेल्या मित्राला आपल्या समोर कोण आहे आणि आपण काय करीत आहोत याचेही भान नसते आणि म्हणूनच त्याच्या हातून काहीही घडू शकते. बेळगाव नजीकच्या काकतीमध्ये असेच घडले. मित्रांचे भांडण सोडवायला गेलेल्या मित्रालाच त्याच्या मित्रांनी दारूच्या नशेत ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी ५ जणांना अटक केली आहे.

सल्लाउद्दीन पकाली हा गेल्या तीन महिन्यापुर्वी काकती येथे आपल्या बायको मुलासह राहयला आला. यापुर्वी तो बंगलोर जवळ राहयला होता. काकती येथे भाडयाच्या घरात राहयला आहे.पुणे बंगलोर या नॅशनल हायवेवरती काकती हे बेळगाव जवळ असल्याने या मार्गावरती रात्रंआणि दिवस वाहनांची आणि प्रवाशांची वर्दळ असते. या हायवेला लागून अनेक लहान मोठया व्यावसायिकांची व्यवसाय आहेत. मालवाहतूक ट्रक टेप्पो यासारख्या वाहनातून मालाची आतंरराज्य आवक जावक होत असल्याने येथे अनेक वाहनांचा थांबा जास्त असतो. त्यातच पेट्रोल पंप, हॉटेल धाबे असल्याने येथे गर्दी ही असतेच. त्यातच पोलीस स्टेशनही जवळच आहे. तरीही मागील तीन चार माहिन्यात या परिसरात दोन ते तीन खूनाच्या घटना घडलेल्या आहेत. ...पान ६ वर

पान १ वरून....

## बायकोच्या नादाने बहकला राव...

त्यामुळे रमेश आईच्या घरी येवून आईसोबत भांडण करत होता. त्याची पत्नी एक सप्टेंबर रोजी पत्नी माहेरी गेल्यामुळे रमेश आईकडे राहण्यासाठी गेला होता. बुधवारी दोन सप्टेंबर रोजी रात्री आठच्या सुमारास त्याने आई सोबत वाद करून तिच्या डोक्यात कुऱ्हाड घालून खून केला. त्यांच्या ओरडण्याने भाऊसाहेब घुगे यांच्यासह शेजाऱ्यांनी धाव घेतली असता रमेशच्या हातात कुऱ्हाड होती, असे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १४ दिवसांसाठी न्यायालयीन कोठीडी सुनावल्याने त्याची हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली.

## दारुडा दाजी येडगे संशयाने झाला येडा...

तीन मुलीचे लग्न झाल्याने थोडे फार कर्ज झालेले होते. तरीही संसार हा नेटाने ती चालवित होती.गावातच तिचे माहेर असल्याने कधी काय लागले सवरले कमी जास्तला ती आपला भाऊ विलास सोनके याच्याकडून उसणे पासणे करीत होती. त्याच्या लग्नाला पंचवीस वर्ष झाले तरी त्या दोघा नवरा बायकोचे कधी पटत नव्हते. त्याच्यात किरकोळ आणि क्षुल्लक कारणातून भांडणे होत होती. या भांडणात तो तिला मारहाण करीत होता. त्यातच त्याला दारूचे व्यसन लागले होते अलिकडे तो कामावरून येताना दारू पिऊन घराकडे येत होता.त्या नशेत तो काही तरी बरळून मंगलचे डोके खात होता. तिच्याबरोबर भांडण उकरून काढून तिला नको नको ते बोलत होता. ती ही त्याला त्या भांडणात जशास तसे उतर देत असल्याने त्याचे पित खवळत होते. ती त्याला उगाच भांडण काढून माझी अब्रु काढू नका. जावाई आले आहेत आता तरी समजुतीने चांगले वागा असे सांगत होती. पण त्याचे मात्र वागणे हे उलटेच होते. भांडणात तो तिच्या माहेरच्या लोकांचा उद्दार करीत असल्याने तिला राग अनावर होत होता. त्यातून ती त्याला उलटे बोलत होती. त्याचा इगो दुखावला की तो तिला मारहाण करून घाणेरडया शिव्या देत होता. त्यावेळी ती आपल्या माहेरी जात होती. बऱ्याच वेळेला त्यांची भांडणे ही शेजार पाजाऱ्यांनी मिटविले होते.तर मंगलचा भाऊ विलास याने देखिल दाजी याला समाजावून सांगितले होते. चांगले वागा. मुले मोठी झाली आहेत. जावाई आला आहे. मंगलबरोबर भांडण करून पै पाहुण्यात तमाशा करू नका. त्यावेळी दाजी हा तेवढयापुरते हो म्हणत होता. नंतर मात्र पहिले पाढे पुढे असे त्याचे वागणे होते. मुलगा अनिकेत हा सोळ सतरा वर्षाचा झाला होता. त्याला ही आपल्या आई वडिलात चालत असलेले भांडण बघून वैताग आलेला होता. प्रत्येक वेळी त्या दोघात भांडण चालले की तो गावातील मामा विलास याला बोलावून आणत होता. तर कधी आपण लहान होऊन आई वडिलांना सांगत होता. घटनेच्या पाच सहा दिवस अगोदर आई वडिलांच्यात भांडणे झाली असताना त्याने मामाला बोलावून आणले होते. मामाने त्यावेळी बहिण आणि दाजी याला ही समजावून सांगितले होते.त्यावेळी विलास याने भांडणात माझ्या बहिणीला विनाकारण त्रास देऊ नकासा. म्हणून दाजीवर हात उगारला होता. याचा दाजीला राग आलेला होता.ते गेल्यावर त्याने परत मंगलबरोबर भांडण करीत माहेरच्या जीवावर आणि तुझ्या भावाच्या जीवावर उडया मारतेस काय म्हणून तिला मारहाण केले होते.त्यावेळी परत त्याच्यात जोरदार भांडण झाले होते. त्या दोघा नवरा बायकोतील घुसफुस ही दोन तीन दिवस चालु होती. शनिवार दि.२९ रोजी ही याच किरकोळ कारणातून सकाळ पासून त्याच्यात भांडणे चालु होती. रात्री ही ती न जेवताच तशीच झोपली होती. मुलगा त्याच्या भांडणाला वैतागून बाहेरच्या हॉलमध्ये झोपला होता. दाजीच्या मनात तिच्याविषयी राग हा होताच. ती दिसायला सुंदर आणि देखणी असल्याने कधी कधी तो तिच्या चारित्र्यावर ही संशय घ्यायचा. शनिवारी ही कधी नव्हे ते त्याने तिच्यावर संशय घेऊन भांडण उकरून काढले होते. त्या दोघातील धुसफूस वाढली होती. बाहेरच्या खोलीत ती झोपली होती. तो आतील खोलीत झोपला होता. रविवार दि.३० ऑगस्टच्या पहाटेच्या सुमारास त्याने झोपलेल्या मंगलला उठवून तिच्याबरोबर भांडण काढले होते. घराचा दरवाजा बंद असल्याने त्याच्या भांडणाचा शेजाऱ्यानां ही आवाज जात नव्हता. त्यातच त्याचे घर हे मेन रोडवर असल्याने वाहनाची वर्दळ ही चालु होती. पहाटे पाचच्या सुमारास त्याचे भांडण विकोपाला गेले होते. त्यातच दाजी याने मंगलचे डोके आणि केस धरून जमीनीवर जोर जोरात आपटले. त्या सरशी तिच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊन ती जागीच निपचिप पडली होती. या घटनेत तिचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच दाजी हा तिच्या रूमला बाहेरून कडी लावून बाहेर निघून गेला होता. काही वेळाने हॉलमध्ये झोपलेल्या अनिकेत याला जाग आल्यावर त्याने कडी काढून आत बघितले तर त्याची आई त्याला रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडल्याचे दिसले. तिच्या डोक्यातून रक्त वाहून ते सुखून गेले होते. भांडणात तिचे केस विस्कटलेले तर साडी ही आस्तावयस्त झाली होती. हे बघून अनिकेत याने मोठयाने हंबरडा फोडला होता. त्याचा अक्रोश ऐकूण शेजारचे लोक ही जमा झाले होते. या घटनेची माहिती अनिकेत याने आपल्या मित्राला सांगितल्यावर त्याने या घटनेची माहिती अनिकेतचा मामा विलास सोनके याना सांगितली होती. ते ही आपल्या कुटुंबासह घटनास्थळाकडे घावत पळत आले होते.

कुणी तरी या घटनेची माहिती मलकापुर पोलीसांना दिल्याने घटनास्थळी मलकापुर पोलीस ठाण्याचे पोलीस ही दाखल झाले होते. पोलीस उपाधिक्षक सुरज गुरव, पोलीस निरीक्षक सराटे, पोलीस उपनिरीक्षक भरत पाटील, हवा. सागर बर्गे, सौरभ कांबळे, सुनिल पन्हाळे यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या सुचनेनुसार घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कऱ्हाड येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. ही घटना नेमकी कशातून झाली आणि ती कुणी केली याची माहिती जवळपास पोलीसांना मिळाली होती. घटनास्थलावरून संशयीत आरोपी पळून गेला होता. त्याचा शोध पोलीस घेत होते. या दरम्यान शवविच्छेदनानंतर मृतदेह पोलीसांनी नातेवाईकांच्या ताब्यात दिला होता. या घटनेची लेखी फिर्याद मयत मंगल येडगे हिचा भाऊ विलास महादेव सोनके (वय ६४) रा.सरस्वती संकुल कन्या शाळेजवल मलकापुर यांनी दिली होती. दरम्यान या घटनेनंतर दाजी येडगे हा गावातच लपून बसला होता. पोलीसांनी त्याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले होते. त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता. तो पोलीसांना थातूर मातूर उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविल्यावर त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी याची माहिती त्याने पोलीसाना दिली. विलास सोनके याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी मंगल दाजी येडगे (वय ४८) हिच्या खूनप्रकरणी तिचा नवरा दाजी आनंदा येडगे (वय ५४) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला कऱ्हाड येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर उभे केले असता. मा.न्यायालयाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सराटे यांच्या मार्गदर्शनाखाली मलकापुरचे पोलीस करीत आहेत. नवरा बायकोचे भांडण विकोपला गेले की त्यातून अनर्थ घडत असतो. म्हणूनच भांडणात संयम हा पाळला गेला पाहिजे तरच त्यातून होणारा अनर्थ टळत असतो. रागाच्या भरात केलेली कोणतेही कृत्य हे विनाशाला नेत असते. याची जाणीव ठेवावी लागते.संसार म्हटले की ताण तणाव हा आलाच. त्यातून नवरा बायकोची भांडणे ही आलीच त्याला स्वभाव ही कारणीभूत असतो.एकाने पसरले तर दुसऱ्याने आवरले तर संसार होत असतो. नाही तर त्यातून खूनासारखी घटना ही घडते. रागाच्या भरात दाजी येडगे याने पत्नीचा खून केला करा पण नंतर त्याला पश्याताप करावा लागला. त्याच्या सुखी संसाराची घडी एका रागाने विस्कटली गेली होती एवढे मात्र खरे....!

## पोलिसांनी कौशल्याने लावला...

मिळालेला होता. पोलीसांनी हे दोन्ही सांगाडे रासायनिक लॅबला पृथ्थकरणासाठी पुणे येथे पाठवून दिल्यावर हे सांगाडे एका पुरूषाचा व महिलेचा असल्याचे तपासात पुढे आले.पोलीसांना मोबाईल नंबर लिहिलेली चिठी मिळाली होती. त्यावरून पोलीस जवळपास वीस दिवस तपास करत होते. जावळीच्या परिसरातून आणि सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्हयातून कुणी बेपत्ता आहे का याची चौकशी करत असताना पोलीसाना सांगली जिल्हयातील कुपवाड पोलीस स्टेशनमध्ये एक पुरूष एक महिला तसेच दोन तरूण असे चार जण सांगली जिल्हयातील बामनोली येथून एकाच कुंटूंबातील चार जण बेपत्ता असल्याची माहिती मिळाली होती. पोलीस या घटनेचा तपास करत असताना पुरूषाच्या सांगडयाजवळ मिळालेल्या मोबाईल नंबरच्या चिठीवरून पोलीसांनी संपर्क केला असता. मयत पुरूषांच्या नातेवाईकांना त्यांनी मिळालेला सांगडा आणि त्यावरील जीर्ण झालेले कपडे आणि इतर वस्तु दाखविल्या होत्या. नातेवाईकांनी त्या वस्तु ओळखून मयत पुरूष हा बामनोली येथील दत्तनगर भागात राहणारे तानाजी जाधव (वय ५५) आणि महिला मंदाकिनी जाधव (वय ५०) असे असल्याची माहिती मिळाली. तसेच या जाधव कुंटुबातील त्याची तरूण मुले तुषार जाधव आणि विशाल जाधव हे गेल्या महिन्यापासून अचानकरित्या आणि गुढ पध्दतीने बेपत्ता असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. जावळी पोलीसांनी यासंबधी कुपवाड पोलीसाकडून माहिती घेऊन पुढील तपासाला सुरूवात केली असता. या चौघांचीही हत्या झाल्याचे पुढे आले आणि त्यातील दोन्ही सांगाडे मार्ली घाटात पोलीसाना मिळून आले होते. या घटनेने पोलीस ही चक्रावून गेले होते. चार जणांची कुणी हत्या केली,आणि ती कोणत्या कारणातून केली, या चार जणांचा मारेकरी कोण याचा उलघडा पोलीस करत असताना या चौघांच्या गुढ हत्येचा उलघडा करण्यात पोलीसांना तब्बल वीस दिवसांनी यश आले.

सांगली जिल्हयातील बामनोली येथील दत्तनगर भागात तानाजी जाधव हे आपल्या कुंटूंबासह राहयला आहेत.ते कुपवाड एमआयडीसीत एका कारख्यान्यात कामाला होते.त्याचे मुळ गाव तासगाव तालुक्यातील सोनी धुळगाव असून तेथे त्यांची शेती आहे.ती शेती त्याचा मोठा भाऊ करतो. गेल्या पंचवीस वर्षापासून ते आपल्या पत्नी मुलासह बामनोली येथे राहयला आहेत. त्याची दोन्ही मुले विशाल आणि तुषार हे दोघे ही शिकून मोठे झाले होते. ते दोघे ही मिलट्री भरती होणार होते. त्यांची तशी इच्छा होती. म्हणूनच ते त्या मार्गात होते. याचवेळी कवठेमहंकाळ तालुक्यातील आगळगाव येथील एका निवृत सैनिकांच्या सपंर्कात ते दोघे आले होते. त्या निवृत सैनिकांचा पुतण्या हा नेहमी आगळगाव येथे येत होता. तो पुतण्या म्हणजे जावळी तालुक्यातील सोमर्डी (शेते) येथील योगेश मधुकर निकम हा होय. तो ही गेल्या काही वर्षापूर्वी मिलट्रीत भरती झाला होता. त्याला मिलट्री भरतीची प्रक्रिया माहित होती. त्याचा संपर्क विशाल आणि तुषार याच्याबरोबर आला होता. त्या दोघांना ही मिलट्रीत भरती व्हायाचे आहे हे त्याने ओळखले होते. दोन चार वेळा त्यांची भेट झालेली होती. त्या भेटीत त्याने त्या दोघांना मिलट्रीत भरती व्हायचे असेल तर लाख दोन लाख रूपये दयावे लागतील आणि हे काम फक्त ओळखीने होते. आणि माझी ओळख ही अशा मध्यस्थी व्यक्तींशी आहे. ते तुमचे काम पैसे दिल्यानंतर करतील तुम्ही तयार असाल तर मला सांगा असे त्याने त्या दोघांना सांगितले होते.त्या दोघांनी ही घरात विचार विनिमय करून योगेश निकम याला पैसे देण्याचे कबुल केले होते. त्याना मिलट्रीत नोकरी करायची असल्याने त्यांनी घरच्या लोकांशी म्हणजे वडिल तानाजी जाधव आणि आई मंदाकिनी व आगळगाव येथील त्या रिटायर सैनिकांशी चर्चा केली आणि योगेश निकम हा मागित असलेल्या रक्कमपैकी थोडी रक्कम म्हणजे जवळपास दीड लाख रूपये त्याला नोकरी लावणेसाठी म्हणून दिले. योगेशने ही त्याना मिलट्रीत पहिल्यादा विशाल याला नोकरी लावतो त्यानंतर तुषार याला लावतो असे सांगून आणखी रक्कम तयार ठेवण्यास त्याना सांगितले.तो त्यानी दिलेली दीड लाख रूपये रक्कम घेऊन गेला. त्यानंतर तो लवकर काही जाधव कुंटूबाच्या संपर्कात आला नाही. माझी पोस्टींग लांब झाल्याचे सांगून तो त्यांची बोळवण करत होता. त्याच प्रमाणे विशाल आणि तुषारने त्याच्यशी फोनवर संपर्क साधला तर तो त्याना मी तुमच्या कामाचे पैसे पुढच्या माणसाला दिलेले आहेत. त्याचा निरोप आला की तुमचे काम होईल असे सांगत होता. त्याच्या सांगण्यावर त्या दोघांचा सुरूवातीला विश्वास बसत होता. कारण नोकरी लावण्यासाठी तो त्याचे काम करणार होता. त्यानंतर ही बरेज दिवस उलटून गेले होते. परंतु योगेशने त्याचे नोकरीचे काम केलेले नव्हते. म्हणून ते त्याच्या मागे लागलेले होते. त्याना तो आज उदया म्हणून टोलवत होता. आता विशाल आणि तुषारचा ही त्याचेवरचा विश्वास उडालेला होता. म्हणून त्या दोघांनी ही दिलेले पैसे परत मागण्याचा सपाटा लावलेला होता. ते दोघे ही काम करा नाही तर घेतलेली रक्कम परत करा म्हणून त्याच्या मागे लागलेले होते. आता योगेशला काय करावे हे सुचत नव्हते. त्याचे पैसे तर त्याने आपल्या व्यक्तीगत कामासाठी खर्च केलेले होते. आता ही रक्कम त्याना कुठून परत दयायची असा प्रश्न त्याच्या समोर पडला होता.त्याचा कायमचा आपल्या मागील तगादा चुकविण्यासाठी त्याने आता वेगळाच विचार केलेला होता. यासाठी त्याने विशाल आणि तुषार या दोघांना आपल्या सोमर्डी (शेते) येथील घरात पैसे परत देतो म्हणून ऑगस्ट महिन्याच्या सुरूवातीला बोलावून घेतले. तेथे त्याने जेवणातून त्या दोघांना विष घातले. त्या विषांचा परिणाम त्याचेवर होईना म्हणून त्याना घरच्या टेरेसवर बोलावून घेऊन बोलता बोलता त्या दोघांच्या डोक्यात जड वस्तुने प्रहार केला. त्यासरशी त्या दोघांच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊन जागीच मृत्यू झाला होता. त्याचा मृत्यु झाल्याचे लक्षात येताच त्याने त्या दोघांना आपल्या कारमध्ये घालून रात्रीच्या वेळी भिलार मार्ली घाटात खोल दरीत आणून टाकले होते. त्या दोघांचा खून करून तो निर्धास्त होता. परंतु आपली दोन्ही मुले त्याच्याकडे पैशासाठी गेलेले आहेत, ते चार पाच दिवस झाले तरी ही परत आले नाहीत म्हणून तानाची जाधव याने योगेश याला मुलांच्याबाबत विचारले असता. ते दोघे ही मुंबईला गेल्याचे त्याने तानाजी जाधव यांना सांगितले होते. परंतु महिना दीड महिना झाला तरी ते परत आले नसल्याने तानाची जाधव याचा योगवरील संशय बळावला होता.ते त्याच्याकडे तुषार आणि विशालची जास्तच चौकशी करू लागल्याने त्याने त्या दोघांना ही तुमच्या मुलांची मुंबई येथे भेट घालून देतो म्हणून सोमर्डी (शेते) येथे बोलावून घेतले. त्याच्या सांगण्यावरून तानाजी जाधव हे आपली पत्नी मंदाकिनी बरोबर त्याच्याकडे ऑगस्टच्या ७ तारखेला गेले. त्या रात्री त्याने तशाच प्रकारे तानाजी जाधव व मंदाकिनी यांना जेवणातून विष घालून मारून टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु ते विष ही त्या दोघांनी पचविले होते. त्यांचा मृत्यू लवकर होत नव्हता.ते दोघे ही अस्वस्थ होते. म्हणून त्याने एका पाठी एक करून त्या दोघांच्या डोक्यात लोंखडी घाव घालून त्यांना ही मारून टाकले.त्यानंतर त्या दोघांचे मृतदेह त्याने आपल्या कार गाडीत घालून परत मार्ली घाटात खोल दरीत नेऊन टाकले. अशा प्रकारे त्याने दीड लाख रुपयासाठी चार जणांचे खून करून या घटनेला अंजाम दिलेला होता. ११ तारखेला तानाजी जाधव यांचा मृतदेह कुजलेल्या स्थीतीत मिळाला होता.त्यांच्या मृतदेहाशेजारी मोबाईल नबंर लिहिलेली चिठी आणि एक हिशोबाची चिठी मिळाली होती. त्यावरून पोलीस तपास करीत आता सोमर्डी (शेते ) येथील योगेश निकम याच्या पर्यत पोहचून त्याला ताब्यात घेऊन त्यांच्याकडे या चार खूनाची चौकशी केली असता. त्याने सुरूवातीला नाही होय करीत नंतर आपला गुन्हा कबुल करून पोलीसांना खरी माहिती सांगितली. त्याने दिलेली माहिती ही पोलीसांना चक्रावून टाकणारी होती. तो सुशिक्षीत असून त्याचे शिक्षण बारावी पर्यत झाले आहे. त्याचे आई वडिल मुंबई येथे होते.अलिकडेच ते सोमर्डी (शेते) सात आठ वर्षापूर्वी येऊन राहिले होते. सुरूवातीला तो कुडाळ येथील नवजीवन विदयालयात कामाला होता.तेथे त्याने पैशाची अफरातफर केल्याने त्याला कामावरून काढून टाकण्यात आले होते. त्यांनतर त्याने संस्था संस्थापिका रोहिणी निंबाळकर याना जातीवाचक शिवी दिली होती. त्यांनी त्याच्या विरोधात अफरातफरीची केस दाखल केल्याने तो त्याच्यावर चिडला होता. त्याने त्याना आपण कुंटूबासह आत्महत्या करणार असल्याची धमकी ही दिलेली होती.तो स्वत:च्या फोसबुक अंकौऊंटवर आपण माजी सैनिक असल्याचे भासवून ड्रेसमधील फोटो ही त्याने टाकला होता. जेणेकरून तो मिलट्रीत असल्याचे तो सांगत होता. परंतु तो कधीच मिलट्रीत नसल्याची माहिती मिळत आहे. त्यानेअशा प्रकारे किती जणांना फसविले आहे याची ही पोलीस चौकशी करत आहेत.

त्याने सांगितलेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याच्या घराच्या टेरेसवर जेथे त्याने त्या चौघांचा खून केला त्याची पाहणी करून पंचनामा केला. तर जेथे त्याने मृतदेह टाकला त्या ठिकाणाचा ही पंचनामा करून पोलीसांनी तानाजी जाधव (वय ५५) मंदाकिनी जाधव (वय ५०), तुषार जाधव (वय २६) आणि विशाल जाधव (वय २०) रा.सर्व बामनोली ता.मिरज जिल्हा सांगली याच्या खूनाच्या आरोपाखाली योगेश मधुकर निकम (वय ३८) रा.सोमर्डी (शेते) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२, २०१.४२० सह विविध कलमा खाली गुन्हा नोंदवून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा तपास सातारा जिल्हा पोलीस प्रमुख तेजस्वी सातपुते अतिरिक्त पोलीस अधिक्षक धीरज पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी अजित टेके, याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील, अशोक पाटील, स.पो.नि.आनंदसिंग साबळे, पो.उप.निरी.संतोष चामे, पी.एच घोरपडे,सुर्यकांत शिंदे,विनोद गायकवाड, मुबीन मुलानी, संजय शिर्के, नंदकुमार महाडिक, सुनिल भिंगारे, राजकुमार ननवरे, योगेश पोळ प्रविण कडव,जितेंद्र शिंदे दतात्रय शिंदे, रोहित बाबर, सनी काळ, इम्रान मेटकरी, पकंज बेसके, गणेश कचरे, डी.जी शिंदे आदिंनी तपास कामात सहभाग घेतला. सध्याच्या काळात विश्वास ठेवयाच तरी कुणावर असा प्रश्न निर्माण होता.या विश्वासानेच अनेकांचा घात ही झाला.परंत गरज ही प्रत्येकाला असल्याने आणि काम होणे ही जरूरीचे असल्याने विश्वास ठेवला जातो त्यातूनच या विश्वासाला तडा जातो आणि अशा खूनाच्या घटना घडतात. म्हणूनच डोळे झाकून कुणी कुणावर विश्वास ठेवू नका. जागो जागी आपल्या योगेश सारखी माणसे भेटत असतात. त्याच्या पासून सावधच राहिलेले बरे....नाहीतर अनर्थ हा आहेच..

## चोरी करणाऱ्या नोकराला मालकाने धरले...

तलावात फेकल्याची कबुली आरोपीने पोलिसांना दिली. पानटपरीच्या गल्लयातील पैसे चोरी करीत असल्याच्या संशयावरून तिघांनी मिळून १८ वर्षांच्या सूरीज पाल या तरुणाची हत्या केल्याचे उघडकिस आल्यानंतर मानपाडा पोलीस ठाण्यात या तिघांविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक करण्यात आली आहे. सुरीज पाल (१८) हा गेल्या दिवसांपासून बेपत्ता होता. सर्वत्र शोध घेऊन ही तो सापडत नव्हता. सुरीज पालचे जवळपासचे कुणी नातलग नसल्यामुळे तो गायब झाला याचे कुणाला सोयर सुतक नव्हते. म्हणून त्याच्याकडे कुणी गंभीर दखल घेतली नाही. नेहमी प्रमाणे सर्व दिनक्रम सुरू होता. सुरीज पाल पानटपरीवर काम करीत होता. त्यामुळे तो बऱ्याच जणांच्या परीचयाचा होता. तो टपरीवर दिसत नसल्यामुळे त्याला ओळखणारे गिर्हाईक पानटपरी मालकाकडे त्याची चौकशी करीत होते. पानटपरी मालक सुनील पटेल लोकांना थातुर मातुर माहिती देऊन लोकांना टाळण्याचा प्रयत्न करीत होता. तो कदाचित त्याच्या गावी निघून गेला असेल असे गिर्हाईकांना सांगत होता. तसा सुरजी पाल चुलबुल पांडे सारखा बोलका होता. म्हणून काहि लोक त्याला चुलबुल पांडे हि म्हणत होते. तसा तो प्रख्यात होता. परंतु अचानक कुणाला ही न सांगता तो गावी गेला कसा.? असा प्रश्न अनेकांना पडला होता. सुरीज पाल हा मूळचा उत्तरप्रदेश बांदा जिल्हयातील एका खेड्यात राहण्यास होता. सुरीज पाल आणि इतर दोघे असे एकूण तिघे जण पोटाचीखळगी भरण्यासाठी डोंबिवलीत आले होते. डोंबिवली मानपाड्यातील पांडुरंग वझे कंपाउंड येथे राहणारा सुनील पटेल यांच्याकडे राहण्यास आले होते. सुनील पटेल हा घराजवळच असणाऱ्या क्लासिक हॉटेलच्या शेजारी असणारी पानटपरी चालवत होता. सुनीलने या तिघांपैकीं सुरीज पाल याला पानटपरीवर कामावर ठेवले होते. व इतर मजुरीचे काम करून सुनील पटेल सोबतच पांडुरंग वझे कंपाउंड येथे राहत होते. सुनील पटेल याने सुरीज पाल याला आसरा दिला होता. परंतु अलिकडे या दोघांमध्ये कुरबुर सुरू झाली होती. यांच्यामध्ये वाद ही होत होते. सुरीज पाल हा पानटपरीवर काम करीत असताना तो गल्यातील पैसे चोरत असल्याचा संशय सुनिल पटेल याला येत होता. ज्याला आपण सहारा दिला,कामधंदा दिला तोच आपल्या धंद्यात चोरी करत असल्याचे समजताच सुनिल पटेल संतापला होता. त्याच्या मनात सुरीज पालबद्दल प्रचंड राग निर्माण झाला होता. सुरीज पाल देखील सुनिल पटेलचे ऐकत नव्हता. तो देखील मालकाच्या तोंडात तोंड देत होता. यामुळे या दोघां मधिल वाद उफाळून येत होता. २० ऑगस्ट रोजी रात्री नेहमी प्रमाणे सुनील आणि सुरीज पाल यांच्यात कडाक्याचे भांडण झाले होते, ते या दोघांचे अखेरचे भांडण होते. कारण तेव्हा पासून सुरीज पाल हा बेपत्ता असल्याची माहिती गुन्हे अन्वेषण विभाग युनिट ३ चे पोलीस अमंलदार राजेंद्रकुमार खिल्लारे यांना मिळाली. खिल्लारे यांनी युनिट ३ वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजू जॉन यांना याबाबत कळवले असता त्याच रात्री गुन्हे शाखेच्या पथकाने सुनील पटेल याला संशयावरून चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्याच्याकडे गुन्हे शाखेच्या पथकाने कसून चौकशी केली असता त्याने सुरीज पाल याची तिघांनी मिळून हत्या केली असता पटेल हा पोलीसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न करीत होता. तो अचानक कुठे निघून गेला याचा मला पत्ता नाही, कदाचित तो गावी निघून गेला असावा असाही संशय त्याने पोलीसांकडे व्यक्त केला होता. मात्र पटेलने सुरीज पालचे काही बरेवाईट केले असल्याची पक्की खबर गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलीसांना होती. म्हणून पोलिसांनी पटेल याची आपल्या खास पद्धतीने पटेल याची कसून चौकशी सुरू केली असता आपण दोन सहकार्याच्या मदतीने सुरीज पाल याची हत्या करून त्याचा मृतदेह एका गोणीत भरून ती गोण क्लासिक हॉटेलच्या मागे असणाऱ्या तलावात फेकल्याची कबुली त्याने दिली.

मृत सुरीज पाल हा महिन्याभरापूर्वी सुनील पटेल कडे कामासाठी आला होता, लॉकडाऊन सुनील हा हॉटेल क्लासिक येथील पानटपरी उघडून तंबाखू, गुटखा आणि सिगारेट विकत होता या टपरीवर त्याने सुरीज पाल याला कामावर ठेवले होते. गेल्या काही दिवसापासून पानटपरीतील गल्ल्यातून पैसे चोरीला जाऊ लागल्यामुळे सुनीलने इतर दोघा सहकाऱ्याकडे चौकशी केली असता सुरीज हा गल्लयातील पैसे चोरी करीत असल्याचे दोघांनी सुनीलला सांगितले. २० ऑगस्ट रोजी सुनील आणि सूरीज या दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले आणि सुनील आणि इतर दोघं सहकाऱ्यानी सुरीजला मारहाण केली होती. या मारहाणीनंतर घरमालकाने सर्वांना दम दिला. त्या नंतर सुनील हा पांडुरंग वझे कंपाउंड येथील खोलीवर सुरीज पाल आणि इतर दोघाना घेऊन आला. २१ ऑगस्ट रोजी मद्यरात्री पुन्हा त्याच्यात भांडण होऊन सुनील आणि इतर दोघे असे तिघांनी मिळून सूरीजला गॅस पाईप, कमरेच्या पट्ट्यांची मारहाण करून त्याचे डोके भिंतीवर आदळून त्याची हत्या केली. सुरीज हा मृत झाल्याचे बघून तिघांनी मृतदेहासोबतच रात्र काढली आणि सकाळी उठून तिघांनी सुरीज पाल याचा मृतदेह एका गोणीत भरून मृतदेह क्लासिक हॉटेलच्या मागे असलेल्या तलावात फेकून दिला अशी कबुली सुनील पटेल यांनी पोलिसांना दिली असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजू जॉन यांनी दिली. गुन्हे अन्वेषण विभाग युनिट ३ वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजू जॉन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक भूषण दायमा, पोलीस उपनिरीक्षक. नितीन मुद्गुण, पो.ह. भोसले, राजेंद्रकुमार खिल्लारे, अजित राजपूत, शिर्के, निकुळे, बंगारा, पाटील आणि ईशी या पथकाने या गुन्हयाचा तपास कौशल्याने करून दुसरा अल्पवयीन आरोपीला अटक केली असून तिसरा आरोपी फरार असून त्याचा कसून शोध घेण्यात येत आहे. याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात हत्या, पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी क्लासिक तलाव येथून सुरीज पाल याचा मृतदेह ताब्यात घेऊन पूर्वतपासणीसाठी रुख्मिणीबाई रुग्णालय येथे पाठवण्यात आला असल्याची माहिती सहाय्यक पोपोलीस आयुक्त किसन गवळी यांनी दिली. विशेष म्हणजे खूनाचा गुन्हा दाखल होण्यापूर्वी पोलीसांनी खूनाच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक करून खूनाचा गुन्हा दाखल केला. याप्रकरणी आता डोंबिवलीतील मानपाडा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## तलवारीचा वाद प्राणावर बेतला...

ॲन्टॉप हिल पोलीस ठाणेचे पो.नि. महादेव कोळी, पो.उ.नि. देशमुख यांनी सायन रुग्णालयात जाउन रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या तरुणांची पाहणी केली असता त्यातील नकी खान या तरुणांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तर मयताचा मित्र या हल्लयात गंभीर जखमी झाल्याने त्याच्या वर उपचार सुरू असल्याचे दिसून आले. पोलिसांनी मयत तरुणांची पाहणी करून पंचनामा केला. त्यानंतर तेथे उपस्थित असलेला मयताचा मावस भाऊ सलमान इरफान खान यांच्या कडे चौकशी केली असता त्याने असे सांगितले की, दि.३सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास ॲन्टॉप हिल येथील कल्पक नाका जवळील सारस्वत बँक जवळ मयत नकी खान व त्याचा मित्र मुस्तकीम हे दोघे उभे असताना त्यावेळी त्यांच्या ओळखीचा एक इसम आला व त्यांच्या मध्ये पैशाच्या व्यवहारातून भांडण सुरू झाले .या भांडणात त्या इसमाने नकी खान या तरुणांच्या छातीवर धारदार चाकूने वार केले .तो रक्तबंबाळ अवस्थेत पडला असता त्याच्या मदतीला धावून गेलेला त्याचा मित्र मुस्तकीम याच्या पाटीतही त्या इसमाने चाकू भोसकुन त्याला गंभीर जखमी केले व तो इसम तिथून पळून गेला .गंभीर जखमी झालेल्या या दोघांना मी सायन रुग्णालयात घेऊन आलो असता डॉक्टरांनी नकी खान यास दाखल करण्यापूर्वीच मयत घोषित केले.अशी माहिती दिली. पोलिसांनी त्याच्या फिर्यादी वरून पाहिजे आरोपीताविरुद्ध ॲन्टॉप हिल पोलीस ठाण्यात गु.र.क्र. २६२/२०२० कलम ३०२, ३०७, ३२३, ५०४,५०६ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद केला .त्यानंतर लगेच या घटनेची माहिती पोलीस उपायुक्त सौरभ त्रिपाठी व सहाय्यक पोलीस आयुक्त रविंद्र पाटील व अंटोप हिल पोलीस ठाण्याचे वपोनी प्रशांत राजे तातडीने रुग्णालयात दाखल झाले. त्यांनी मयत व जखमी तरुणांची पाहणी करून गुन्हा घडल्यानंतर घटनास्थळावरून परागंदा झालेला पाहिजे आरोपीचा शोध घेणेकामी तात्काळ पोलीस पथक बनवून शोध घेण्याच्या सूचना दिल्या. मध्य प्रादेशिक विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण,परिमंडळ ४ चे पोलीस उपायुक्त सौरव त्रिपाठी, सहाय्यक पोलीस आयुक्त, सायन विभाग (अ.का.) रविंद्र पाटील यांचे मार्गदर्शनाखाली ॲन्टॉप हिल पोलीस ठाण्याचे व.पो.नि. प्रशांत राजे, पो.नि. महादेव कोळी, पो.उ.नि. विजयसिंह देशमुख, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि. कोरडे आणि पोउनि झाडे आदी तपास करू लागले.जखमी इसम व फिर्यादी कडून मिळालेल्या अल्पशा माहितीवरून आरोपीचा शिताफीने शोध घेऊन गुन्हा घडल्यापासून अगदी आठ तासांमध्ये आरोपी आरोपी साबीर शाहिद शेख(वय १९) याला ॲन्टॉप हिल मधून ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्याची चौकशी केली असता, तपासत ही माहिती पुढे आली.

ॲन्टॉप हिल येथील कल्पक नाका जवळील सारस्वत बँक जवळ नकी खान हा तरुण राहत होता. त्याच्या मित्राचा वाढदिवस होता. मित्राच्या वाढदिवसानिमित्त तो तलवारीने केक कापू इच्छित होता. पण तलवार भेटत नव्हती. त्याने अनेकांकडे तलवारी बाबत विचारणा केली मात्र कोणी त्याला तलवार दिली नाही. शेवटी आरोपी साबीर शाहिद शेख याने नकी खान याला तलवार दिली. दरम्यान मित्राचा वाढदिवस साजरा झाला. मात्र नकीने ती तलवार साबीर याला परत केली नाही .बरेच दिवस उलटून गेले तरी तो तलवार परत करायचे नाव घेत नसल्याने शेवटी दि.३ सप्टेंबर रोजी साबीर हा संध्याकाळी नकी खान च्या घराकडे गेला .त्यावेळी रात्री ८ च्या सुमारास नकी खान हा त्याचा मित्र मुस्तकीम सोबत, ॲन्टॉप हिल येथील कल्पक नाका जवळील सारस्वत बँक जवळ बोलत उभा होता. त्यावेळी साबीर त्या ठिकाणी आल. तो आपली तलवार मागू लागला. मात्र नकी तलवार देत नव्हता. तेव्हा सबीरने तलवार दे किंवा त्याबद्दलयात मला ३ हजार रुपये दे. असे म्हणत त्या दोघांत पैशाच्या व्यवहारातून भांडण सुरू झाले. या भांडणात साबीर शेख याने आपल्या जवळील धारदार चाकूने नकी खान या तरुणांच्या छातीवर धारदार चाकूने वार केले. तसाच तो रक्तबंबाळ होऊन खाली पडला. त्यावेळी नकीचा मित्र मुस्तकीम हा नकीच्या मदतीला धावून गेला असता, साबीरने त्याच्या ही पाटीतही चाकूने भोसकुन त्याला गंभीर जखमी केले व तिथून पळून गेला शेवटी पोलिसांनी त्याला ४ सप्टेंबर रोजी अटक केली. ही कामगिरी मध्य प्रादेशिक विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, परिमंडळ ४ चे पोलीस उपायुक्त सौरव त्रिपाठी, सहाय्यक पोलीस आयुक्त, सायन विभाग (अ.का.) रविंद्र पाटील यांचे मार्गदर्शनाखाली ॲन्टॉप हिल पोलीस ठाण्याचे व.पो.नि. प्रशांत राजे, पो.नि. महादेव कोळी, पो.उ.नि. विजयसिंह देशमुख, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि. कोरडे आणि पोउनि झाडे इत्यादींनी यशस्वीरित्या पार पाडली. गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. कोळी व पो.उ.नि. देशमुख करीत आहेत.

07 TO 13 SEPTEMBER 2020 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 05/09/2020 8:27 PM Page 1



# मुंजलवाडी ते रावेर आणि मुंजलवाडी ते रमजीपुर रस्त्यांची अवस्था अतिशय दयनीय



**रावेर/प्रतिनिधी**

तालक्यातील मुंजलवाडी ते रावेर आणि मुंजलवाडी ते रमजीपुर या रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था झाली असुन, हे रस्ते अपघातास कारणीभुत ठरत आहे. या रस्त्याने वाहन चालकांना प्रवास करतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या रस्त्याने प्रवास करीत असतांना रस्त्यात खड्डा आहे का? खड्डयात रस्ता? हेच समजायला मार्ग नाही जणु दारु पिल्यासारखी वाहने डुलत-डुलत चालवावी लागत आहे. या रस्त्याने पायी चालणे देखील जिकरीचे झाले आहे. कारण रस्त्यांच्या भागाचा केव्हा तुकडा पडेल याचा नेम नाही? पाल ते इंदौर हायवे बनल्याने मोठ्या वाहनांची जास्त वर्दळ या रस्त्याने असते. क्षमतेपेक्षा जास्त वजनाचे ट्रक हे मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, दिल्ली, हरियाना, उत्तरप्रदेश मधुन येणारे मोठ-मोठे ट्रक ये-जा करीत असतात. यामुळे या मुंजलवाडी जवळील दोन्ही पुलांजवळील मोठमोठ्या खड्यांमुळे मोठा अपघात होऊन जीवीतहानी होणे नाकारता येत नाही. तसेच या रावेर ते मुंजलवाडी रस्त्याने संबधित बांधकाम विभागाचे अधिकारी नेहमी ये-जा करीत असतात. मात्र त्यांना सदरील पुलांजवळील खड्यांचा धोका कळत नाही का? याचा अर्थ असा होतो की संबधित अधिकारी व पदाधिकारी यांना या रस्त्याचा संपुर्ण प्रकार माहिती असल्यावरही डोळे मिटुन दुधावरची मलाई खात आहेत आणि परिसरातील शेतकरी, मजुर, महीला, प्रवाशी, वाहनचालक यांचा भावना दुखावण्याचे कार्य करीत आहेत,अ से परिसरातील जनतेकडुन बोलले जात आहे व चर्चेस उधान आले आहे. तरी संबधित बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकारी व पदाधिकारी यांनी संबधित रस्त्यांच्या खड्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्ता दुरुस्ती करण्याचे काम ताबडतोब हाती घ्यावे व रस्त्यावरील खड्डयांवर डांबरीकरण करावे अशी परिसरातील जनतेकडून, वाहनचालक, शेतकरी, मजुर यांचेकडुन मागणी करण्यात आली आहे.

## डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराजांना श्रद्धांजली



**देवणी/प्रतिनिधी**

येथील श्री गुरुलिंगेश्वर विरक्त मठात बुधवार दि २ सप्टेंबर रोजी सायंकाळी लिंगैक्य डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांना भक्तांकडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविक प्रा.रेवण मळभगे यांनी मांडले यानंतर गुरुमाऊलीच्या प्रतिमेस मंगल आरती करून पुष्प अर्पण वाहण्यात आली. त्यानंतर मान्यवर आपले मनोगत व्यक्त केले व उपस्थित असलेल्या सर्व सद्भक्तांनी पुष्प अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केले. यावेळी गुरुलिंगेश्वर विरक्त मठाचे मठाधिपती सिद्धलिंग महास्वामीजी, मल्लिकार्जुन मानकरी, सी.एम.बिराजदार गुरुजी, शेषराव मानकरी, नगराध्यक्ष वैजिनाथ अस्टुरे, चंद्रकांत स्वामी, उद्धव मल्लेशे, बसराज बुदे, वैजनाथ कारामुंगे, कांतराव अंबुलगे, बसवराज हरनाळे, शिवशंकर पडसलगे, विजयकुमार पाटील माणिक हरकंचे, आनंद जीवने ,सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग कदम, स्वप्नील बावगे, राजकुमार मुर्गे, बंडेप्पा महाजन, शंकर येडे, विजय कुमार लूल्ले, गिरीश पत्री, मयूर पटने, सोमनाथ कुडते, गुंडप्पा कंटे, श्रीमती प्रभावती मंठोळे आदी सह बहुसंख्य भक्तगण उपस्थित होते.

## थोडक्यात वृत्तांत

### महिलांसाठी ऑनलाइन उखाणे स्पर्धा

वाडा : महिला आर्थिक विकास महामंडळाच्यावतीने महिला बचत गटासाठी ऑनलाईन उखाणे स्पर्धा घेण्यात येणार आहे. कोविडच्या या निराशामय काळात महिलांचा उत्साह वाढविण्यासाठी माविमच्यावतीने गौरी गणपती सणानिमित्त ऑनलाईन उखाणे स्पर्धा घेतली जात आहे. ही स्पर्धा सर्व महिलांसाठी खुली राहील. नाविण्यपूर्ण आशयाचे जनजागृती करणारे, ऐतिहासिक मूल्य असणारे, सामाजिक आशय असणारे दीड ते तीन मिनीटांचे उखाणे १० सप्टेंबरपर्यंत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाच्या palghar.mavimgmail.com या संकेतस्थळावर पाठविण्याचे आवाहन केले आहे.

### शिवाजीराव देवकते यांचे निधन



देवणी : येथील रहिवाशी व उदगीर येथील विद्या वर्धनी शाळेचे माजी मुख्याध्यापक शिवाजीराव सोपानराव देवकते यांचे निधन झाले असून त्यांच्या मूळ गावी एकंबा येथे अंत्यविधी करण्यात आले आहे.

### नणंदेचा भावजयेवर चाकू हल्ला

भिवंडी : चहा बनवण्याच्या क्षुल्लक वादातून नणंद-भावजयमध्ये बाचाबाची होऊन नणंदेने भावजयवर चाकूने वार केल्याची घटना दर्गारोड येथे घडली आहे.या चाकू हल्ल्याप्रकरणी नणंदेविरोधात भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अनम आरिफ अन्सारी (२४) असे गुन्हा दाखल झालेल्या नणंदेचे नाव आहे. भावजय सगुफ्ता मुस्ताक अन्सारी(१६) हिला तिच्या आईने चहा बनवण्यास सांगितल्याने सगुफ्ता ही किचनमध्ये चहा बनवण्यास गेली त्यावेळी अनमने सदर ठिकाणी जाऊन 'मेरे को चाय बनानी है' असे सांगितले तेव्हा सगुफ्ता अनमला 'माँ को चाय देनी है' असे बोलली या गोष्टीचा मनात राग धरून अनमने सगुफ्ताचे केस पकडून तिला शिवीगाळ करत चाकूने तिच्या डोक्यात वरच्या बाजूस वार करून गंभीर जखमी केले आहे. या घटनेचा पुढील तपास भोईवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आर.एस.लोमटे करीत आहेत.



### प्रियदर्शिनी विद्यालयात शिक्षकदिन साजरा

देवणी : देवणी तालुक्यातील मौजे जवळगा येथें भारताचे माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या निमित्त प्रियदर्शिनी विध्यामंदिरात शिक्षक दिन साजरा करण्यात आला यावेळी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या प्रतिमेचे पुजन शाळेतील जेष्ठ शिक्षक पांडुरंग पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यांनातर सर्व शिक्षकांनी पुष्प वहन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पाटील यांनी केले यावेळी मुख्याध्यापक उद्धव तवडे, माधव पाटील, गिरजप्पा बिरादार, उमाकांत चावंड,नरसिंग परिहार, संतोष पाटील, सुमित मुळे यांनी सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जीवनावरील माहिती दिली.

### पादचारी महिलेवर धारदार शस्त्राने हल्ला

भिवंडी : भाजीमार्केटमधून भाजी घेऊन घरी जाणाऱ्या महिलेस दोन अज्ञात इसमांनी रस्त्यात अडवून धमकी देत धारदार शस्त्राने महिलेवर हल्ला केल्याची घटना ठाणगे आळी येथे बुधवारी दुपारी घडली आहे. या हल्ल्याप्रकरणी दोघा अज्ञातांवर निजामपूरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रंजिता संदीप बोल्लू (३८) ही महिला भाजी घेऊन घरी जात होती. त्यावेळी ठाणगे आळी येथील गल्लीतून जात असताना दोन अज्ञातांनी तिला रस्त्यात अडवून तुमचे कासारआळी येथे असलेले पेंटिंगचे दुकान तुझ्या नवऱ्याला सोडून द्यायला सांग नाहीतर अजून जास्त त्रास होईल अशी धमकी देत धारदार शस्त्राने तिच्या पाठीवर, उजव्या बाजूस व डाव्या हाताच्या दंडापासून मनगटापर्यंत वार करून गंभीर जखमी केले आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या रंजीता हिला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेचा पुढील तपास निजामपूरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बाजीराव भुसारे करीत आहेत.

# भिवंडीत शेतकऱ्याच्या आंब्यांच्या कलमांची धारदार कोयत्याने छाटणी करून केले नुकसान

**भिवंडी/अभिजित हिरे**



शेतीला पूरक म्हणून आंबा फळबाग लागवड करून आर्थिक लाभ मिळवण्याच्या हेतूने माळरानावर ५० आंब्यांच्या कलमांची लागवड करून फळबाग निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्याच्या आंबा कलमांची अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने छाटणी करून फळ बागेचे नुकसान केल्याची घटना शेडगांव येथे घडली आहे. मधुकर शंकर पांढरे असे आंबा फळबागेचे नुकसान झालेल्या शेतकऱ्याचे नांव आहे. त्याने भातशेतीला पूरक व्यवसाय म्हणून कृषी विभागाकडून म.ग्रा.रो.ह.योजनेअंतर्गत आंबा फळबाग या योजनेतून ५० हापूस आंब्यांची कलमे घेऊन त्यांची लागवड माळरानावरच्या एक एकर जमीनीवर केली होती. महिनाभरापूर्वी कलमांची लागवड केल्याने त्यांची निगा व देखभाल शेतकरी मधुकर पांढरे हे करीत होते. दोन ते तीन वर्षातच आंबा फळबाग बहरणार होती.मात्र हि फळबाग अज्ञात शत्रूच्या नजरेत भरल्याने त्याने धारदार शस्त्राने आंब्यांची कलमे कापून ती जमिनीवर आडवी पाडली आहेत. त्यामुळे शेतकरी मधुकर पांढरे यांचे मोठे नुकसान झाले असून आंबा बागायतीचे स्वप्न तुर्तास धुळीला मिळाले आहे. दरम्यान आंबा कलमांच्या छाटणीचा संशय मधुकर पांढरे यांनी लवलेश भोईर यांच्यावर घेतला असून त्याबाबतची तक्रार गणेशपुरी पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या पालखणे दुरक्षेत्र पोलीस चौकीत दाखल केली आहे.

# नांदेड परिक्षेत्राचे नवे महानिरीक्षक निसार तांबोळी यांची नियुक्ती!

**देवणी/शकिल मनियार**



एक डॅसींग ऑफिसर म्हणून ज्यांनी आपली कारकीर्द गाजविली असे शिरूर अनंतपाळ तालुक्याचे सुपुत्र निसार तांबोळी यांची नांदेड परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आल्याने शिरूरअनंतपाळ व देवणी परिसरात त्यांच्या मित्रमंडळी व ग्रामस्थाकडुन आनंद व्यक्त केला जात आहे . निसार तांबोळी यांचे शिक्षण परभणी येथे झाले. हिंगोली पासून आपल्या पहिल्या नोकरीची सुरुवात त्यांनी केली. एक पारदर्शक अधिकारी अशी त्यांची प्रतिमा असून त्यांनी महाराष्ट्रातील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करत आपले पदभार स्विकारले. मुंबई, ठाणे अश्या महत्त्वपूर्ण ठिकाणी त्यांनी आपली जबाबदारी पार पाडली.भ्रष्टाचारमुक्त प्रशासन असा त्यांचा दंडक असून गरिबीची जाण असलेला ग्रामिण भागातील एक अधिकारी या परिक्षेत्राला मिळाला आहे. लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली अश्या चार जिल्ह्याचा स्वतंत्र कारभार ते पाहतील. त्यांनी अनेक पदाचा कारभार सांभाळताना कुणावरही अन्याय होणार नाही अशीच भूमिका घेतली, अनेक प्रलोभने धुडकावून लावत एक सजग अधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले आहे . आपल्या भागात त्यांची होणारी दमदार एन्ट्री नक्कीच गुन्हेगारीला कर्दनकाळ ठरणार आहे. अत्यंत उच्च विद्याविभूषित असलेले हे कुटुंब नक्कीच ग्रामीण संस्काराचा पगडा त्यांच्यावर आहे. हिंगोली, नाशिक, औरंगाबाद, मुंबई, ठाणे, लातूर अश्या ठिकाणी त्यांनी अनेकांच्या मुसक्या बांधण्याचे काम केले आहे. गुन्हेगारांचा कर्दनकाळ असलेल्या निसार तांबोळी यांची दमदार एन्ट्री नक्कीच या भागातील गुन्हेगारी क्षेत्राला नवी दिशा देईल, अशी अपेक्षा त्यांच्या मित्र परिवारानी व्यक्त केली आहे.

# जिल्हयातील शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थींनी इंडिया पोस्ट पेमेंण्टस बॅकेमध्ये खाते उघडून घ्यावे

**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय डाक विभाग व इंडिया पोस्ट पेमेंण्टस बॅक यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी ज्यांचे बँक खाते नाही किंवा बॅक खाते हे आधार क्रमांकाशी संलग्नीत नाही अशा विद्यार्थांची शिष्यवृत्ती अद्याप बँक खात्यामध्ये जमा झालेली नाही. जिल्हयातील सुमारे ३.७ लाख विद्यार्थ्यांसाठी इंडिया पोस्ट पेमेंण्टस बँकद्वारे खास अकांऊट उघडण्याची मोहिम सुरु करण्यात आलेली आहे. जिल्हयातील शिष्यवृत्ती लाभापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांनी इंडिया पोस्ट पेमेंटस बॅके मध्ये खाते उघडून आधार नंबरशी संलग्नीत करुन दिले जाणार आहेत. त्याअनुषंगाने डाकघर अधिक्षक, बी. रवि कुमार, उस्मानाबाद डाक विभाग, मुख्यालय लातूर यांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी सदर सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# देवणीतील महादेव विद्यालयाचे ग्रंथपाल व लिपिक सेवानिवृत्त

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यातील महादेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील ग्रंथपाल पाटील एम.एम.व लिपिक उळागड्डे देविदास हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी -प्राचार्य रामलिंग मुळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून देवणी पंचायत समितीचे सभापती- चित्रकलाताई बिरादार, जिल्हा परिषद सदस्य- प्रशांत पाटील जवळगेकर, पर्यवेक्षक- खोंडे यु.एन. प्रा. कांबळे आर.व्ही उपस्थित होते. महादेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने पाटील एम. एम. व उळागड्डे देविदास यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार करून निरोप देण्यात आला. पंचायत समितीचे सभापती- चित्रकलाताई बिरादार व जिल्हा परिषद सदस्य- प्रशांत पाटील जवळगेकर यांनी पाटील एम. एम.व उळागड्डे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, ग्रंथ भेट देऊन सत्कार केला. कोरोना संसर्गजन्य साथ रोगाच्या प्रादुर्भावामुळे खबरदारी म्हणून प्रयोगशाळा विभागात निरोप समारंभाचा छोटेखानी कार्यक्रम घेण्यात आला. ग्रंथपाल पाटील एम. एम. उळागडडे यांनी आपल्या कार्याची सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत प्रामाणिकपणे आपली सेवा बजावली आहे. आणि यशस्वीरित्या जबाबदारी पार पाडली. शांत व संयमी व्यक्तिमत्व म्हणून या दोघांची संस्थेत ओळख होती. या कार्यक्रमाप्रसंगी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, दशरथ पाटील, रेखाताई मधुकर पाटील, सुवर्णा ताई देविदास उळागड्डे, सिद्धेश्वर पाटील, मुकेश पाटील, बिरादार बी.पी., रोळे आबाजी, खंडागळे पद्माकर यांच्या सह पाटील व उळागड्डे यांच्या परिवारातील कुटुंबीय, मित्रपरिवार उपस्थित होते आणि सर्वांनी पुढील दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिले. या कार्यक्रमाचे संचालन-शेटे आर.व्ही.यांनी केले तर आभार-केसाळे बी.एस यांनी मानले.

# पालिकेत कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त होताना सर्व निधी देऊन सन्मान

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी महापालिकेत सेवा बजावणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांना सेवानिवृत्ती नंतर त्यांच्या हक्काचे भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी, शिल्लक रजेचे वेतन, सेवा उपदान या निधी मधील पैसे मिळण्यास मागील काही वर्षात महापालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाईस आल्याने खंड पडला होता त्यास आयुक्त डॉ.पंकज आशिया यांनी तिलांजली देत कर्मचारी सेवानिवृत्त होत असतानाच्या दिवशी त्यांच्या हाती त्यांचे पैसे देण्याचा उपक्रम पुन्हा एकदा सुरू केला आहे. आयुक्तांनी भिवंडी महानगरपालिका प्रशासनाचा पदभार स्वीकारताना आस्थापना विभागाची माहिती घेताना या बाबत आदेश दिला नंतर सोमवारी सेवानिवृत्त होणारे विनायक शिंदे व आरोग्य मुकादम नारायण आहिर यांना भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी, शिल्लक रजेचे वेतन, सेवा उपदान असे चार धनादेशाच्या माध्यमातून देऊन त्यांना आयुक्तांनी निरोप दिला. या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे व उपायुक्त मुख्यालय डॉ. दीपक सावंत, शिक्षण विभागाचे उपायुक्त सुभाष झळके, भविष्य निर्वाह निधी प्रमुख सुधीर गुरव, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले उपस्थित होते. भिवंडी महानगरपालिका आर्थिक डबघाईस असताना भविष्य निर्वाह निधी सह इतर ठिकाणी कर्मचाऱ्यांचे जमा होणारे पैसे इतर खात्यात वळविल्याने मागील चार ते पाच वर्षापासून कर्मचाऱ्यांची देणी प्रलंबित आहेत. सेवानिवृत्ती नंतर कर्मचाऱ्यांना आपल्या हक्काच्या पैशांसाठी मुख्यकायचे उंबरठे झिजवावे लागत असून त्या मध्ये निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांचाही समावेश आहे. आज ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सुमारे ६० लाख रुपये देणे धकीत असून लवकरच ते पैसे देण्याबाबत प्रक्रिया सुरू केली असल्याची महिती लेखाधिकारी डॉ. कालिदास जाधव यांनी दिली आहे. महापालिकेत तब्बल ३५ वर्ष सेवा करून आरोग्य विभागातून कार्यालय अधीक्षक पदावरून सेवानिवृत्त होणारे विनायक शिंदे यांनी आपण निवृत्त होण्याच्या दिवशी आपली सर्व रक्कम मिळत असल्या बद्दल समाधान व्यक्त करून प्रशासनासह आयुक्तांचे आभार व्यक्त केले आहेत.

# भिवंडी पोलिसांनी लावला ट्रक चोरणाऱ्या टोळी छडा!

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी येथील डीमार्ट वेअर हाऊसमधून गृहपयोगी वस्तू आयशर ट्रकमध्ये भरुन पुणे येथील डीमार्ट स्टोअर येथे घेऊन जात असताना आयशर ट्रक मालक दिवानाका येथे पार्क करुन विश्रांती करिता गेला. तेव्हा डुप्लिकेट चावीच्या साहाय्याने ट्रकसह एकूण १६ हजार किमतीचा माल १२ ऑगस्ट रोजी चोरट्यांनी लंपास केला होता नवी मुंबईत तसे वाहन चोरीला जाण्याचे प्रकार तुरळक आहेत असे असताना हा ट्रक चोरीला गेल्यामुळे पोलीसांनी याप्रकरणाची गंभीर दखल घेतली होती. पोलीस आयुक्त संजय कुमार,पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-१) चे पंकज डहाळे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक वस्त,अनील गिते, वरीष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर गवसने नीतिन खाडे आणि पथकाने या गुन्ह्याच्या तपासाला सुरुवात केली होती. तपास पथकाने घटनास्थळी जाऊन बारकाईने पाहणी केली असता तेथे पोलीसांना सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेऊन पाहणी केली असता काही संशयित आरोपींची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीसांनी रेकॉर्ड वरील काही गुन्हेगारांची माहिती काढली असता ट्रक चोरीच्या गुन्ह्यातील ऐका रेकॉर्डवरील आरोपीचे नाव,गाव समजले. हाच धागा पकडून तपास पथक आरोपींच्या मागे लागले होते. तेंव्हा २३ ऑगस्ट रोजी चंपालाल मगाजी चव्हाण (वय-३०) याला पोलीसांनी उचलल्या नंतर चंपालालने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी प्रकाश चौधरी (वय-३०) मोहम्मद नसीम भोला पठाण(वय-२०) या आरोपींना अटक केल्यानंतर गुन्ह्यात वापरलेली स्वीफ्ट कार (एम ऐच ०३ ५३४२) पोलीसांनी आरोपींकडून जप्त केली. या गुन्ह्यातील चौथा आरोपी वॉन्टेड होता. आता तपास पथक या आरोपीच्या मागे लागले होते. चोरीचा माल विकत घेऊन तो कमी भावात विकण्याचे काम नरेश भानुशाली हा आरोपी करीत होता. पोलीसांनी नरेश भानुशाली याची नाकाबंदी केल्यामुळे नरेश याला २८ ऑगस्ट रोजी पोलीसांना सापडला. पोलीसांनी चौघांची कसून चौकशी करून आरोपींकडून १८ लाख रूपयांचा माल हस्तगत केला.

दरम्यान पोलीसांनी या गुन्ह्याबद्दल अधिक माहिती देताना सांगितले की, अटक आरोपी विरुद्ध मुंबईतील चारकोप, कस्तुरबा मार्ग, घाटकोपर व इतर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असून हे सराईत गुन्हेगार असून हि टोळी चोरीच्या व्यवसायात पारंगत आहेत. शॉर्टकट मार्गाने झटपट श्रीमंत होण्यासाठी हि टोळी चोरीच्या अवैध धंद्यात उतरली होती. अगदी सराईतपणे चोऱ्या करून या चौकडीने मुंबई, नवी मुंबईत धुमाकुळ घातला होता. परंतु आता हि चौकडी चोर नवी मुंबई पोलीसांच्या पोलीस कोठडीत पोहचले आहेत. या गुन्ह्याचा उलगडा करण्यासाठी उपायुक्त पंकज डहाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक वस्त, यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक नितीन गिते यांनी पोलीस निरीक्षक अजित पाटील, सहायक पोलीस निरीक्षक नितीन खाडे, सागर गवराने, उपनिरीक्षक शरद आव्हाड, हवालदार मेघराज देवरे, रघुनाथ मागी, अजित यादव, हेमंत पाटील, वैभव पोळ, तुषार जाधव, नितीन सोनवणे आदींचे पथकाने विशेष परिश्रम केले. रबाळे एमआयडीसी पोलिसांच्या या कौतुकास्पद कामगिरी बद्दल संपूर्ण नवी मुंबईत कौतुक केले जात आहे.

07 TO 13 SEPTEMBER 2020 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 05/09/2020 8:28 PM Page 1



# मुंबईकरांनो हातात बांगड्या भरल्या आहात का?

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. तसेच ती जगातील एक मोठी औद्योगिक महानगरी आहे आणि याच महानगरी मधून देशाला सर्वाधिक म्हणजेच ४४ टक्के महसूल मिळतो आणि त्याच्यावर देशाचा आर्थिक गाढा चालतोय. भारतातील प्रत्येक राज्यामधील लोकं इथे पोट भरायला येतात आणि त्यांना मुंबईने कामधंदा दिलाय. वेगवेगळ्या क्षेत्रात नाव आणि पैसा कमावण्याची संधी मुंबईने दिली. त्यामुळे मुंबईमध्ये रिकाम्या हाताने आलेले लोकं जाताना गोणी भरून पैसा घेवून जातात आणि अशा प्रकारे त्यांना मोठं होण्याची संधी या मुंबईने दिली आहे आणि आज त्याच मुंबईवर काही बेईमान परप्रांतीय टांगवर करीत आहेत आणि इथले काही हरामखोर राजकारणी त्यांच्या सुरात सुर मिसळत आहेत. कोण कुठला सुशांत सिंह राजपूत बिहार वरून इथे नशीब आजमावयला आला. येताना काय तो बिहार वरून डबोल घेवून आला नव्हता. त्याने जे काही थोडेफार पैसे कमावले ते इथेच येवुन कमावले. मात्र हा पैसा त्याला राखून ठेवता आला नाही. त्याने तो अय्याशीत उढवला आणि कंगाल झाल्यामुळे त्याला नैराश्य आले आणि त्यातून त्याने आत्महत्या केली. पण त्याच्या आत्महत्येचे निमित्त करून काही लोकं मुंबईला आणि मुंबई पोलिसांना गुन्हेगार ठरवीत आहेत. मुंबईची बदनामी करीत आहेत आणि मुंबईकर हे सगळ उघड्या डोळ्यांनी बघत आहेत. मुंबईकरांनी हातात बांगड्या भरल्या आहेत का? सुशांतसिंग राजपूतच्या आत्महत्येमुळे बिहारी लोकं मुंबई पोलिसांवर टीका करीत आहेत. त्यांना इथे मुंबईने जर आश्रय दिला नसता, काम दिले नसते तर देशाच्या कुठल्याही राज्यात त्यांना कुणी भिक सुद्धा घातली नसती. पण ज्या मुंबईने त्यांना रोजी-रोटी दिली त्या मुंबईवरच ते उलटले. त्यामुळे अशा बेईमान लोकांना मुंबईत राहण्याचा अधिकार नाही. त्यांनी बिहारला चालते व्हावे. मुंबईचे सर्वात जास्त उपकार आहेत ते बॉलिवूडवर! दिलीप कुमार, देव आनंद, अमिताभ, राजेश खन्ना, खान मंडळी ते सुशांत सिंह राजपूतपर्यंत सगळ्यांनाचं मोठं होण्याची नाव कमावण्याची संधी दिली. तेंव्हा या बॉलिवूडवाल्यांना मुंबई चांगली वाटत होती आणि आता एका फालतू आत्महत्येचा केसमुळे संपूर्ण मुंबई वाईट झाली? कोण कुठली फडतूस कंगना राणावत आज मुंबीची तुलना पाकव्याप्त काश्मीर बरोबर करतेय? तिची हिम्मत तरी कशी झाली मुंबईतील स्थिती जर पाक व्याप्त काश्मीर सारखी असती तर कंगना आज बॉलिवूडमध्ये नाही तर कुठल्यातरी कोठ्यावर दिसली असती. मुंबईबद्दल बोलण्याची कंगना सारख्या कॅरेक्टर लेस बाईची ओकात आहे का? चित्रपटात काम मिळवण्यासाठी आपल्याला किती जणांसोबत झोपावे लागले हे जी बाई उघडपणे सांगते ती बाई मुंबई बद्दल बोलते आणि मुंबईकर हे सगळ सहन करतात हा प्रकारच संतापजनक आहे. मुंबई पोलिसांची तुलना स्कॉटलंड यार्डच्या पोलिसांशी केली जाते. मुंबई पोलिसांनी मुंबईतील संपूर्ण अंडरवर्ल्डचा खात्मा केला आहे. मुंबई पोलिसांनी २६/११च्या हल्ल्यातून मुंबई वाचवली आहे आणि तेही २२ पोलिस कर्मचाऱ्यांनी प्राणाचे बलिदान देवून मुंबई वाचवली आहे. त्यामुळे मुंबईतील जनता मुंबई पोलिसांची ऋणी आहे आणि अशा मुंबई पोलिसांवर त्या भिकार चोट बिहाऱ्यांचा नादाला लागून आमचेच काही पुढारी मुंबई पोलिसांवर टीका करीत आहेत जे चुकीचे आहे. अरे कुठे ते जंगली बिहारी आणि कुठे सुसंस्कृत महाराष्ट्र. त्यामुळे महाराष्ट्रात राहून जे कुणी मुंबई पोलिसांच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहेत त्यांनी थोडी तरी आपल्या मराठी मातीची जाण ठेवावी आणि ज्या कंगणाने मुंबईची पाकव्याप्त काश्मीर बरोबर तुलना केली आहे. तिच्या झिंज्या धरून तिला मुंबईतून बाहेर हकलावे आणि तिला तिची लायकी दाखवून द्यावी आणि हे काम आमच्या मुंबईतील मराठी रणरागिणी करू शकतात. ज्या मुंबईवर आपल्या आईसारखं प्रेम आहे त्या आमच्या मराठी भगिनींनी कंगणाला धडा शिकवून मुंबईचा स्वाभिमान दाखवून द्यावा. कारण कंगना सारख्या लायकी नसलेल्या बाया कोरोडो लोकांची पोशिंदा असलेल्या मुंबईवर आणि मुंबई पोलिसांवर टीका करतेय हे खपून घेण्याच्या पलीकडचे आहे. तिची मुजोरी तर बघा म्हणतेय की ९ तारखेला मी मुंबईत येतेय ज्यांच्यात हिम्मत असेल त्यांनी मला अडवून दाखवावे? कोण काय माझे वाकडे करतोय तेच मला बघायचे आहे? तिची ही मुजोर भाषा म्हणजे एक प्रकारे मुंबई महाराष्ट्रातील जनतेला उघड आव्हान आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता आणि खास करून मुंबईकरांनी तिच्या या चॅलेंजची गंभीर दखल घेवून तिला मुंबई विमानतळावर पाय ठेवायला देवू नये. एक महिला असल्याचा जर ती इतका गैरफायदा घेत असेल तर आता तिच्याकडे केवळ एक महिला म्हणून बघणे चुकीचे ठरेल. तर तिच्याकडे महाराष्ट्राची शत्रू म्हणून या पुढे बघावे. आज जे भाजपवाले तिला झाशीची राणी म्हणून खांद्यावर घेत होते त्यांनी कंगणाच्या विरोधात महाराष्ट्रातील जन संताप पाहताच त्यांचीही आता फाटली आहे आणि ते आता सारवासारव करीत आहेत. त्यांचं नशीब चांगलं की आता महाराष्ट्रात कुठलीही निवडणूक नाही अन्यथा महाराष्ट्रात राहून इथल्या मातीशी बेइमानी करण्याची फार मोठी किंमत त्यांना चुकवावी लागली असती.

# धार्मिक स्थळांचे राजकारण



कोरोनाच्या संकट लोकांनी खरे तर जिवंत माणसांचा जास्त विचार करायला हवा. कोरोना बाधित लोकांना कसे वाचवता येईल किंवा कोरोना काळात करण्यात असलेल्या लॉकडाऊनमुळे जी कुटुंब उद्ध्वस्त झालीत त्यांचं पुनर्वसन कसं करता येईल याचा विचार इथल्या राजकारण्यांनी करायला हवा होता. पण त्याकडे दुर्लक्ष करून राजकारणी धार्मिक स्थळांच्या मुद्यावरून एकमेकांच्या विरोधात दंड ठोकून उभे राहिलेत. त्यामुळे आता लोकांचं लक्ष कोरोनावरून या धार्मिक तणावाकडे वळले आहे. औरंगाबादचे गेल्या दोन दिवसांपासून जे काही बघायला मिळाले ते संतापजनक होते. एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यानी धार्मिक स्थळे उघडण्यासाठी आंदोलन पुकारले आहे. त्यासाठी त्यांचा मंदिर आणि मशिदीत घुसण्याचा प्रयत्न होता. पण पोलिसांनी तो हाणून पाडला. तर दुसरीकडे जलील आमच्या मंदिरात घुसणार कोण त्याने आमच्या धार्मिक प्रश्नात पडू नये. सरकार सांगेल तेंव्हा आम्ही मंदिरे उघडू असे शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी सांगितले. औरंगाबाद हे महाराष्ट्रातील एक प्रमुख संवेदनशील शहर आहे. त्यामुळे निदान कोरोनाच्या संकट काळात तरी येथे कोणताही धार्मिक वाद होवून त्यातून जातीय तणाव निर्माण होता नये असे येथील जनतेला वाटते. पण पुढाऱ्यांना कोण सांगणार? त्यांच्या डोळ्यासमोर फक्त मतांचं गणित असतं त्यासाठी ते कोणत्याही तडजोडी स्वीकारू शकतात. खैरे यांच्यावर नाराज असलेला औरंगाबाद मधील हिंदू समाज सहजपणे आपल्याकडे वळवता येईल असे गणित जलील यांनी मांडले आणि कदाचित त्यातूनच त्यांना मंदिर खुले करण्यासाठीं आंदोलन करण्याची आयडिया सुचली असावी. सरकारने जो पहिला लॉकडाऊन जारी केला, त्यावेळी जी नियमावली तयार केली होती, त्यात उद्योग धंद्याच्या सोबतच शाळा-कॉलेज, परिवहन सेवा आणि धार्मिक स्थळे ही बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. आता साडेचार महिन्यांच्या नंतर अनलॉक प्रक्रियेअंतर्गत हळूहळू सर्व सुरू केले जात आहेत. त्यात उद्योग धंदे, दुकाने, कार्यालये काही प्रमाणात परिवहन सेवा यांचाही समावेश आहे. मात्र धार्मिक स्थळे उघडण्यासाठी परवानगी नाही आणि धार्मिक मुद्दा चलनी नाण्यासारखा असल्याने जे सध्या विरोधी बाकावर त्यांना हा मुद्दा सरकारला घेरण्यासाठी हत्यारा सारखा वाटतोय. म्हणून ते आंदोलनाचे उपद्व्याप करीत आहेत. सध्या धार्मिक स्थालांकडे श्रद्धे पेक्षा व्यवसायाच्या दृष्टिकोनातून अधिक पाहिले जाते. त्यामुळे जे लोक व्यापारी दृष्टिकोनातून धार्मिक स्थलांकडे बघतात अशा लोकांचा देवाशी, धर्माशी किंवा श्रद्धेशी दुरान्वये ही संबंध नाही. पण त्याचा धंदा बंद पडल्याने धार्मिक स्थळे सुरू करण्याची त्यांना घायी झाली आहे आणि अशा लोकांसाठी एमआयएकसारख्या संघटना किंवा भाजपासारखे पक्ष आंदोलने करीत आहेत. त्यामुळे धार्मिक स्थळे उघडण्यासाठी सुरू असलेली ही आंदोलने प्रायोजित तर नहीत ना असा आता संशय यायला लागला आहे. पण जे राजकीय पक्ष मंदिरे खुली करण्यासाठी आंदोलने करीत आहेत. त्यांना जिवंत माणसांचा मात्र विसर पडलाय. आज मंदिरे खुली होण्यापेक्षा जे वेगवेगळ्या आजाराने त्रस्त आहेत त्यांना उपचार मिळणे आणि त्यांचा जीव वाचणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यासाठी राजकीय पक्षांनी आंदोलन करायला हवे. आज खाजगी डॉक्टर त्यांच्याकडे उपचारासाठी गेलेल्या रुग्णांना हात लावत नाहीत. दोन फुटांवर बसवूनच काय होतंय असे विचारून औषध गोळ्या देत आहेत. अशा प्रकारे कुठे उपचार होतात का? मग अशा डॉक्टरांच्या विरोधात भाजपवाले किंवा एमआयएमवाले का आंदोलने करीत नाहीत.

**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

कोरोनाच्या संकट काळात खाजगी रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर रुग्णांची लूट करण्यात येत असून अवाच्या सव्वा बिले आकारून रुग्णांच्या नातेवाईकांचे खिसे कापण्यात आले. त्यांच्या विरूद्ध भाजपा किंवा एमआयएमने आंदोलन का केले नाही? आज लोकल ट्रेन अत्यावश्यक सेवेतील लोकांसाठी सुरू आहे. या आत्यावश्यक सेवेत वैद्यकीय सेवाही येते. त्यामुळे वैद्यकीय सेवेतील डॉक्टर, नर्सेस, वॉर्ड बॉय आणि इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांना लोकल प्रवासाची मुभा आहे. पण ही वैद्यकीय सेवा ज्या आजारी लोकांसाठी आहे. त्यांना मात्र लोकल ट्रेन मधून प्रवास करण्यास बंदी आहे.

या अन्यायाच्या विरोधात कुठला पक्ष आंदोलनासाठी का पुढे येत नाही. दगड मातीच्या देव आणि देवळांसाठी किंवा मशिदीसाठी आंदोलने करणे या लोकांना महत्वाचे वाटते. पण जिवंत माणसांना जागवण्यासाठी हे लोक पुढे येत नाहीत. कारण जिवंत माणसांना बेवकूफ बनवण्यासाठी दगड मातीचे देव, धर्म, देवळे, मशिदी याच गोष्टी महत्त्वाच्या असतात आणि यालाच म्हणतात धर्माचे राजकारण! जे प्रत्येक पक्षासाठी आवश्यक बनले आहे.

**(मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३)**



# ऑनलाईन सर्कस...

**(पूर्वी करमणुकीचे माध्यम असलेल्या सर्कसला बदलत्या काळात उतरती कळा लागली. सर्कसच्या नामांकीत कंपन्या बंद पडू लागल्या आणि त्यातील कलाकार बेरोजगार होऊ लागले. त्यातही काही सर्कसचालकांनी तग धरण्याचा प्रयत्न केला होता. आधीच समस्यांचा डोंगर असताना आता त्यात करोनाच्या संकटाची भर पडली. त्यामुळे सर्कसचालक आणि त्यातील कलाकार मेटाकुटीला आले. त्यामुळे आता शेवटचा पर्याय म्हणून ऑनलाईन सर्कसचा प्रयोग केला जात आहे. या प्रयोगाच्या निमित्ताने सर्कसचा इतिहास आणि वाटचालीचा घेतलेला हा आढावा..)**



सर्कस म्हणजे मनोरंजनात्मक कार्यक्रम. ज्यात प्रशिक्षित प्राण्यांचे सादरीकरण आणि मानवांचे कौशल्यपूर्ण साहसी खेळ असतात. आपण सगळ्यांनीच कधीना कधी सर्कस पाहण्याचा आनंद घेतला आहे. बदलत्या ळात अनेक विविध प्रकारची मनोरंजनाची माध्यमे, साधने लोकांसाठी उपलब्ध झाली. म्हणूनच सर्कसला जाणाऱ्यांची संख्या आणि लोकप्रियताही कमी झाली. गेल्या २ दशकात साधारण १२ मोठ्या सर्कस कंपन्या बंद झाल्या. बऱ्याच लहान सहान कंपन्याही बंद झाल्या पण त्यांची कोणालाच माहिती नाही. सध्या भारतात 'ग्रेट बॉम्बे सर्कस', 'जम्बो सर्कस', 'रॅम्बो सर्कस' आणि लहान-मोठ्या मिळून सुमारे ७ सर्कस कंपन्या आहेत. त्यापैकी सक्रिय सर्कस कंपन्या अगदी तुरळक आहेत. करोना महामारीमुळे टाळेबंदी करण्यात आली. यात सर्वच उद्योग-धंदे, व्यायवसायिक, नोकरदार वर्ग, रोजंदारीवर काम करणारे कामगार आर्थिक संकटात सापडले. असेच आर्थिक संकट सर्कसमध्ये काम करणाऱ्या कलाकार, कर्मचारी, व्यवस्थापक यांच्यावरही आले. आधीच सर्कस लोप पावत चालली असल्यामुळे सर्कस व्यवसाय डबघाईला आला आहे. त्यात करोनाच्या संकटामुळे सर्कसमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना अधिक चटके बसत आहेत. आता यातून बाहेर पडण्यासाठी रॅम्बो सर्कसने एक वेगळा प्रयोग करण्याचे ठरवले आहे. हा प्रयोग म्हणजे ऑनलाईन सर्कस होय. २५ ते २७ सप्टेंबर या तीन दिवसात ऑनलाईन सर्कस दाखवली जाणार आहे.

**● सर्कसची पार्श्वभूमी ●**

सर्कसचे मूळ हे मदाऱ्याचे खेळ, डोंबाऱ्याचे खेळ इत्यादी खेळांमध्ये आहे. हे खेळ आपल्या लोककलेचाच एक भाग आहेत. मात्र या खेळांना लोककलेत नेहमीच दुय्यम स्थान मिळाले. या लोकखेळांचे उगमस्थान इजिप्त मानले जाते. साधारण इ.स.पूर्व २ हजार ५०० पासून या खेळांचे प्रदर्शन होत असल्याचे पुराव्यानिशी पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे. भारत, ग्रीस, चीन आदी देशांमध्येही प्राचीन काळापासून हे खेळ खेळले जात आहेत. ९ व्या शतकापासून या लोकखेळांची लोकप्रियता वाढली. सादरकर्त्या संघांना राजाश्रय मिळू लागले. तेव्हाच्या इंग्लंड, फ्रान्सच्या राजांनी या खेळांना प्रोत्साहन दिले. रोममध्ये तर आधुनिक सर्कसचा घाट घालण्यात आला होता. खऱ्या अर्थाने आधुनिक सर्कसचे जगात पहिल्यांदा इंग्लंडमध्ये १७६८ साली प्रदर्शन झाले. पुढे संपूर्ण जगात सर्कस कंपन्या उभ्या राहिल्या. सर्कससाठी लागणाऱ्या प्रशिक्षण केंद्रांची उभारणी झाली. हा खेळ एक व्यवसाय म्हणून पुढे आला. सर्व कंपन्यांमध्ये सर्जनशील प्रदर्शन कोण करते यावरुन स्पर्धा होत असे. साधारण १७९६ नंतर सर्कसमध्ये वाघ, सिंह, हत्ती सारखे जंगली प्राण्यांचा मंनोरंजनासाठी वापर होऊ लागला. २१ व्या शतकात सर्वच देशांनी कायद्याने सर्कस आणि इतर सर्वच मंनोरजनात्मक माध्यमांमध्ये प्राणी वापरण्यावर बंदी आणली. तसेच बालमजूर कायदेही लागू केले ज्यामुळे सर्कसमध्येही लहान मुलांची प्रात्यक्षिके बंद झाली. कीलेरी कुन्हिकान्नन

**दिशायन**

यांना भारताच्या सर्कसचे पितामह म्हटले जाते. ते मार्शल आर्ट्स आणि जिमनॅस्टीक्सचे प्रशिक्षक होते. त्यांनी १८८८ मध्ये केरळ येथे सर्कस हॉल उभारला, प्रशिक्षण केंद्र सुरू केले आणि सर्कसमध्ये नावीनयपूर्ण खेळ आणले. सर्कसला सोन्याचे दिवस आणण्यामागे यांचा सिंहाचा वाटा होता असे म्हटले जाते. मात्र भारतात सर्कसची स्थापना महाराष्ट्रात झाली. यासाठी सोलापूरच्या कुर्डुवाडीच्या राजांनी प्रोत्साहन दिले. अश्वरोहक आणि गायक विष्णुपंत छत्रे यांनी ३० मार्च १८८० ला सर्वप्रथम सर्कसची सुरुवात केली. तेव्हाही भारतीय सर्कसचे कार्यक्रम देश-विदेशांत होत असत. इंग्लंडमध्ये भारतीय सर्कस कंपन्यांना मागणी होती.

**● सर्कसला उतरती कळा... ●**

काळात ओघात सर्कस मागे पडली. टाळेंबदी पूर्वी ग्रेट बॉम्बे सर्कसने माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, ७ ते ८ वर्षापूर्वीपर्यत महिनाअखेरी कार्यक्रम करून ४० लाख रुपये हाती येत होते. त्यातून कलाकार, कामगार, सेट-प्रॉपर्टी, व्यवस्था इत्यादी पैसे देऊन कंपनीला थोडा तरी फायदा होत होता. मात्र गेल्या काही वर्षात ५० टक्के रक्कम हाती येत नाही. सर्कसमध्ये काम करणाऱ्यांची कुटुंबे हालाकीचे जीवन जगत आहेत. कलाकार स्वत: पोटाला चिमटे काढून घरी पैसे पाठवतात. आज काही वृद्ध मंडळीही सर्कसमध्ये व्यवस्थापनाचे काम करतात. ज्यांनी या सर्कसच्या सुवर्ण दिवसांचाही अनुभव घेतला आहे. अनेक लोक सर्कसमध्ये काम करण्यासाठी घर-दार सोडून यायचे इतकी क्रेझ होती. जशी आज चित्रपटसृष्टीबाबत आहे.

सर्कसचे कार्यक्रम, परदेश दौरे कमी होतात. सर्कसमध्ये काम करणारे बहुतांश व्यक्ती कमी शिकलेले असल्यामुळे त्यांना इतर ठिकाणी नोकरी मिळत नाही. अकुशल कामगार किंवा इतर दुय्यम कामे करण्यासाठी गेले तरी सर्कसमधून आले म्हणून त्यांना बाजूला सारतात. नोकऱ्या देत नाहीत. शेवटी सर्कससाठीच ते आपले आयुष्य वाहून घेतात. सर्कसच्या या अवस्थेमुळे नवे कलाकार तर मिळत नाहीतच. पण शिकलेल्या मुला-मुलींसाठी सर्कस हा करिअरचा पर्यायच नाही आहे. त्यांनी कधी सर्कस पाहिलीही नसेल. त्यामुळे कंपनीत काम करत असलेली पिढी सरल्यानंतर सर्कस कायस्वरुपी बंदी होऊन जाईल. मार्च अखेरीस अचानक टाळेबंदीमुळे नवी मुंबईत ऐरोली येथे रॅम्बो सर्कसचा ६० जणांचा समुह सर्कस कॅम्पमध्ये अडकला. त्यांच्यावर जवळजवळ उपासमारीची वेळ आली. त्यांच्याकडे असलेले थोडे-थोडके पैसे त्यांनी आपल्या कुटुंबियांना पाठवले. वादळ, पाऊस पडल्यानंतर तेथे पाणी साचले, डास, माशा पसरल्या. तरी पर्याय नसल्यामुळे ते तेथेच राहात आहेत. माध्यमांनी बातमी दिल्यानंतर त्यांना मदत मिळाली.

**● एका नव्या प्रयोगाकडे वाटचाल ●**

सर्कसला वाचवण्यासाठी काही संस्था पुढे आल्या त्यांनी स्पॉन्सरशिप दिली. 'बूक अ स्माईल'सोबत टाय-अप केले आणि ऑनलाईन सर्कसची कल्पना पुढे आली. रॅम्बो कंपनीने सहज तयारी दर्शवली. सर्कस वाचणार असेल आणि आम्हाला आमच्या कुटुंबीयांना पोटापण्यासाठी पैसे मिळणार असतील तर नवे प्रयोग करण्यासाठी तयार आम्ही आहेत, असे सर्कसमधल्या कलाकारांनी माध्यमांना सांगितले. २५, २६ आणि २७ सप्टेंबर रोजी सर्कसचे ऑनलाईन कार्यक्रम प्रदर्शित होणार आहेत. याचे 'तिकीट बुकींग बूक माय शो' वर करता येणार आहे. एका कार्यक्रमाच्या तिकीटाची किंमत १९९ रुपये आहे.

आज सर्कस आणि सर्कसमध्ये काम करणाऱ्यांची स्थिती अतिशय दयनीय झाली आहे. त्यांचे दोन वेळेच्या जेवणाचेही हाल आहेत. तर त्यांच्या कुटुंबियांना हालाखीच्या परिस्थितीत जगावे लागत आहे. ते मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण देऊ शकत नाहीत, सुख-सुविधा पुरवू शकत नाहीत. सर्कसमधले हे कलाकार संपूर्ण जगाला आनंद देतात मात्र आज ही मंडळी आज दु:खाच्या लाटेवर तरंगत आहेत. त्यांना मदत करण्याचे आवाहन व्यावसायिक, सामजिक कार्यकर्ते आणि विविध सर्कस कंपन्यांना वेळोवेळी आर्थिक मदत करणारे शशीकांत सपकाळ यांनी केली आहे.

आपल्या अस्तित्वासाठी झगडणाऱ्या सर्कसला या नव्या संकल्पनेकडून खूप आशा आहे. सर्वत्र ऑनलाईन संकल्पना रुजत असताना सर्कस या नव्या माध्यमात तग धरेल, असा विश्वास त्यांना वाटतो. त्यांच्या या नव्या प्रयोगाला कितपत यश येईल ते लवकरच कळेल.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अ‍ॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# कोरोना झाला म्हणून नाती तोडू नका - राजेश टोपे

**मुंबई/प्रतिनिधी**

कोरोनाच्या भीतीमुळे नात्यांवर कसा परिणाम होतो याचं उदाहरण आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी कोरोनाशी दोन हात या चर्चासत्राच्या कार्यक्रमात दिलं. आई-मुलाचं नातंसुद्धा कोरोनाच्या भीतीमुळे दुरावल्यासारखे झालं. त्यामुळे आपली नाती तोडू नका, आईशी असलेली नाळ तोडण्याची आपली संस्कृती नाही. कोरोनाची भीती बाळगू नका व कुणालाही वाळीत टाकण्याची मानसिकता ठेऊ नका. शिक्षित व्हावं योग्य ती खबरदारी घ्यावी परंतु नात्यातील, संबंधातील प्रेम-जिव्हाळा कमी होऊ देऊ नका, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी केले. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील 'कोरोनाशी दोन हात' या कार्यक्रमात आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्याशी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शांतीलाल मुथ्था यांनी कोरोना: 'अवास्तव भीती व गैरसमज' याविषयी केलेल्या चर्चेचा तिसरा भाग आज प्रसारीत झाला. त्यावेळी आरोग्यमंत्री बोलत होते.



टोपे म्हणाले, लोक भीतीपोटी खूप चुका करतात. एखादा कोरोनाबाधीत झाला तर त्यामुळे पॅनिक होण्याची गरज नाही. पनवेलमधील घटनेचे उदाहरण देईल, ज्यामध्ये आई असिम्प्टोमॅटीक होती, ती बरी झाली. ती बरी झाल्यानंतर तिला घरात घ्यायची तिच्या मुलाला भीती वाटायला लागली. त्याला वाटलं आईमुळे मला व घरातील इतरांना प्रादुर्भाव होईल. हा आजार बरा होतो मात्र हा आजार झालेल्यांशी वाळीत टाकल्याप्रमाणे वागू नका. नातेसंबंध जपत आजारावर मात करा. राज्यात आतापर्यंत कोरोनामुक्त झालेल्यांमध्ये किमान ५००० रुग्ण असे आहेत ज्यांचं वय ८० वर्षापेक्षा जास्त आहे. ९० वर्षे वयापुढील जवळजवळ ६०० लोक बरे झाले आहेत. त्यामुळे कोरोनाची भीती न बाळगता सावधतेने आणि काळजी घेऊन त्याचा सामना करा.

नागरिकांना दिलासा देताना आरोग्यमंत्री म्हणाले, कोरोनाबाधित रुग्ण १०-१२ दिवसांमध्ये या आजारातून बाहेर पडू शकतात. ही लक्षणांवर आधारीत उपचार पद्धती आहे. त्यात काही मोठी शस्त्रक्रिया वगैरे असे काहीच नाही. सायटोकॉईन स्टॉर्म मध्ये आपले शरीर आपल्याच सेल्सला मारते. सायटोकॉईन स्टॉर्म चे एक कारण कधीकधी काहीशी भीतीसुद्धा असते. त्यामुळे भीती बाळगू नका. आपल्याला प्रादुर्भाव होऊ नये ह्या गोष्टीचे आपण शिक्षण घ्यावे. आपण काळजी घेऊन काम केले तर काही अडचण येत नाही. भीती न बाळगता, काळजी घेत काम करत रहावे हाच सध्या कोरोनाबरोबर जगण्याचा महत्त्वाचा सिद्धांत आहे. संसर्गाचे प्रमाण जास्त हाकोरोना विषाणूचा मुख्य गुणधर्म आहे. परंतु याची जागतिक टक्केवारी पाहिली तर ८० टक्क्यांपर्यंत लोकं असिम्प्टोमॅटीक आहेत. कोरोनाची तीन स्वरूप आहेत सौम्य, मध्यम आणि गंभीर. सौम्य स्वरूपासाठी १० दिवस सीसीसीमध्ये (कोरोना केअर सेंटर) राहून लक्षणांवर आधारित उपचार देऊन त्यांची फक्त प्रतिकारशक्ती वाढवतो. उर्वरित १५ टक्के लोकांना लक्षणे असतात. ताप, सर्दी, खोकला असतो, काही लोकांच्या तोंडाची चव जाते, काही लोकांना जेवावसं वाटत नाही. उर्वरित काही २-३ टक्के रुग्ण गंभीर असतात.

आज साडेसहा लाख लोक बाधित झाले आहेत. चाचण्यांसाठी शासनाच्या २७०-७५ लॅब व खासगी ७०-७५ अशा सगळ्या मिळून ३६९ लॅबमधून २४ तासात रिपोर्ट येत आहेत. अँटीजेन टेस्ट आणि अण्टीबॉडी टेस्ट वाढवल्या आहेत. मी पुन्हा एकच सांगेन कि, गरीब माणसाला डोळ्यासमोर ठेवून घेतलेले हे सगळे निर्णय आहेत. त्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही, असेही आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# भिवंडीत तीन मोटरसायकल चोरट्यांना अटक

**भिवंडी/अभिजित हिरे**



भिवंडीत वाहन चोरांनी थैमान घातला असल्याने वारंवार होणाऱ्या वाहन चोरीच्या घटनांनी वाहन चालक हिरं झाले होते. रोजच्या वाहन चोरीच्या घटनांना आळा बसावा यासाठी भिवंडी परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे यांनी शहरातील सहाही पोलीस ठाण्यांना वाहन चोरांच्या मुसक्या आवळण्याचा अदेश दिले होते त्यांनतर नारपोली पोलिसांनी वाहन चोरी प्रकरणातील तीन वाहनांचा शोध घेतला असून याप्रकरणी तीन वाहन चोरट्यांना अटक करण्यात आली असल्याची माहिती शुक्रवारी नारपोली पोलिसांनी दिली आहे. दर्शक कीर्ती हरनिया (वय २३ रा .अंजूरफाटा) यांची शाईन मोटर सायकल चोरी झाली होती याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नारपोली पोलिसांनी तपास करून आरोपी इस्तियाक लियाकत अली अंसारी उर्फ पंजाबी (वय ३५) यास अटक करून चौकशी केली असता सदर मोटर सायकल त्याने काल्हेर येथून चोरी केल्याची कबुली दिली आहे. दुसऱ्या घटनेत फिरोज इब्राहिम शेख (२७) यांची ऍक्टिव्हा दुचाकी चोरीला गेली होती. याप्रकरणी अन्वर मुक्तार सय्यद (२२ रा. साकीनाका मुंबई) यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली आहे. तर तिसऱ्या घटनेत सत्यवान बबन शेट्ये (४५) यांची रजिस्टर न झालेली नवीन मोटर सायकल चोरीला गेली होती. सदर गाडी चोरी प्रकरणी आरोपी सैफ जलालुद्दीन अंसारी (२१ रा . जैतुनपुरा) यास अटक केल्या नंतर त्याने वाहन चोरीची कबुली दिली आहे. विशेष म्हणजे या तिन्ही मोटर सायकल या तीनही चोरट्यांकडून पोलिसांनी हस्तगत केल्या असल्याची माहीती नारपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे यांनी दिली आहे.

# टेंभुर्णी पोलिसांनी महामार्गावर चाकू दाखवून लुटणाऱ्या टोळीला जेरबंद

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावर माल वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकांना व क्लिनरला जबर मारहाण करीत चाकूचा धाक दाखवून लुबाडणाऱ्या पाच जणांना त्यांच्याकडील दोन स्विफ्ट कारसह टेंभुर्णी पोलिसांनी सापळा रचून आरोपींना जेरबंद केल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल हिरे व पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली. डॉ विशाल हिरे यांनी यावेळी बोलताना सांगितले. गेल्या काही दिवसांपासून सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावर वारंवार छोटे मोठे गुन्हे घडत होते. मात्र किरकोळ तक्रारी असल्याने अथवा नको ती कटकट म्हणून माल ट्रक चालक गुन्हे दाखल करीत नव्हते. याचाच गैर फायदा घेऊन चक्क कारमध्ये येऊन दरोडे टाकणाऱ्या टोळ्यांमध्ये तरुणांची संख्या वाढली होती. त्यामुळे टेंभुर्णी पोलिसांनी राष्ट्रीय महामार्गावर गस्त वाढविली होती.



दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी मध्य रात्री नंतर एक ते दीड वाजण्याच्या सुमारास वरवडे टोल नाक्याच्या पश्चिमेस दोन किमी अंतरावर मालट्रक चालक अनिस वशारद उल्ला (वय ३६) हा त्याच्या जवळ असलेला माल ट्रक (यूपी ७० जीटी ७३५३) मध्ये रोपे घेऊन हैद्राबादला गेला होता. तेथून रिकामा मालट्रक घेऊन तो पुन्हा सोलापूर जिल्ह्यातील सांगोला शहरात गेला होता. तेथून डाळिंब घेऊन उर्वरित डाळिंब घेण्यासाठी तो माढा तालुक्यातील भुईंजे गावातील मार्केटकडे निघाला होता. तो वरवडे टोल नाका येथे थांबलेल्या कार (एमएच ०४ डीएफ ७५१७) बसलेल्या लोकांना रस्ता विचारला. त्याच कारमधून चारजण उतरून आले व ट्रकमध्ये जबरदस्तीने घुसले. त्यांनी चालक व क्लिनर यांना मारहाण करून जखमी केले. तसेच चालकाच्या गळ्यास चाकू लावून त्यांच्या खिशातून ३८००० हजार रोख, ५ हजार रुपयांचा मोबाईल असा एकूण ४३ हजार रुपयांचा ऐवज घेऊन ते कारमध्ये बसून निघून गेले. चालक अनिस उल्ला याने टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

यानंतर पोलिसांनी या कारचा व आरोपीचा शोध घेऊन रोहन देविदास ढवळे (वय २४), रणजित बलभीम ढवळे (वय २३), महादेव विठ्ठल ढवळे (वय २४), सोहम विठ्ठल मस्के (वय २०) व सुरज तुकाराम महाडिक (वय १९) यांना पहाटेच्या सुमारास दगड अकोले शिवारातील कॅनॉलच्या पुलाजवळ दडून बसले असताना पकडले. तसेच त्यांचा कार (एम एच ०४ इएफ ३६९३) व कार एम एच ०४ डीएफ ७५१७ या दोन कार जप्त करण्यात आले. ५०६/२०२० भादंवि ३९५ प्रमाणे गुन्हा दाखल झाले आहे. ही कारवाई सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मनोज पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे तसेच अशोक बाबर, राजेंद्र डांगे, दत्ता वजाळे, राजेंद्र ठोंबरे, धनाजी शेळके यांनी ही कारवाई पार पाडली आहे. पुढील तपास टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे करीत आहेत.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात नवीन वैद्यकीय पदवी महाविद्यालय आणि पदव्युत्तर संस्था सुरू करण्याबाबतचा परिपूर्ण अहवाल तयार करा-अमित देशमुख

**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने विद्यापीठ परिसरात नवीन वैद्यकीय पदवी महाविद्यालय व वैद्यकीय पदव्युत्तर संस्था तसेच आयुर्वेद, होमिओपॅथी आणि भौतिकोपचार पदवी महाविद्यालय सुरू करण्याबाबतचा परिपूर्ण अहवाल तयार करून विभागास सादर करावा असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.दिलीप म्हैसेकर यांना आज दिले.



महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कामकाजासंदर्भातील आढावा बैठक आज मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.दिलीप म्हैसेकर, कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण, टाटा मेमोरियल सेंटरचे डॉ. कैलास शर्मा, रिलायन्स हॉस्पिटलचे संचालक डॉ. गुस्ताद डावर यांच्यासह विद्यापीठाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत विद्यापीठ कामकाजाचे सादरीकरण, तसेच विद्यापीठाचे प्रस्तावित पदवी व पदव्युत्तर वैद्यकीय, आयुर्वेदिक, होमियोपॅथी महाविद्यालयांना स्थापनेच्या अनुषंगाने आढावा आणि सादरीकरण तसेच विद्यापीठाने कोविड -१९ च्या अनुषंगाने विद्यापीठाने केलेली कामे याबाबत आढावा घेण्यात आला. वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठासाठी आकृतिबंध मंजूर करण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ विद्यापीठाच्या निधीतून शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे तयार करू शकते का, विद्यापीठाचे प्रादेशिक केंद्र चालविण्यासाठी राज्य शासनाने जमीन देणे,विद्यापीठ डॉक्टरांच्या लोकसंख्येच्या अनुषंगाने अनुज्ञेय ब्रुहत आराखडा तयार करण्यात यावा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात फिजिओथेरपी, नर्सिंग, व्यावसायिक थेरपी महाविद्यालय सुरु करण्याचे निर्देश देण्याबरोबरच राज्य शासन वैद्यकीय, आयुर्वेद, होमिओपॅथी महाविद्यालयाचे आरोग्य विज्ञान शिक्षण केंद्राचे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संकुल कसे होईल, कुत्रिम बुद्धिमत्ता निर्माण कशी करता येईल याबाबत अहवाल तयार करावा असे निर्देश दिले. राज्यस्तरीय मान्यताप्राप्त महाविद्यालयासाठी रेटिंग दिले जाऊ शकते का, विद्यार्थी व शिक्षकांना ऑनलाईन सेवा सुविधा कशा देता येतील, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा विमा कसा काढता येईल, शारीरिक अपंग विद्यार्थ्यांना काय वेगळया सेवा देता येतील, विद्यापीठ संशोधनावर अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी काय करता येईल याबाबत वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी विद्यापीठाचे कुलगुरू यांना अहवाल तयार करण्यास सांगितले.


PUBLIC WORKS DEPARTMENT PWD MAHARASHTRA

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**

**ठाणे विघुत विभाग, सा.बां. विभाग, सा. बां. परिसर,**

**मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) पिन कोड-४०० ६०१.**

दूरध्वनी क्र : (०२२) २५३३ ३१४४ / (०२२) २५३० ४५१४

वेबसाइट : www.mahapwd.com ई-मेल : elthane.ee@mahapwd.com

जा.क्र.काअ/ठाविवि/निविदा-१/९७४/सन २०२० दिनांक २० ऑगस्ट २०२०

## निविदा सूचना क्र. २० सन २०२०-२०२१

**संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८**

**कार्यकारी अभियंता, ठाणे विघुत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४** हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता **ब-१** नमुन्यातील टक्केवारी दर (Pereentage Rate) ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीव्दारे निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विघुत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम रु. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक/ ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Est. No. KESD/OW/314/2020-21 Providing & Erection of 22/0.433 KVA x 1 No. Distribution Transformer, Fensing for giving power supply to M/s. Mukhyadhapak, Govemment Ashram School Suryamal, Tal. Mokhada Dist. Palghar. | रु. ८,४९,२१४/- | दिनांक २८/०८/२०२० सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक ११/०९/२०२० सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग-क वर्ग व त्यावरील नोंदणीकृत विघुत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम (Erection of 22/ 0.433 KVA x 1 No. Distribution Transformer.) केल्याचा अनुभव आहे इसारा रक्कम रु. ८,५००/- निविदा शुल्क रु. ५००/- अधीक वस्तु व सेवा कर | दिनांक १५/०९/२०२० सकाळी ११.०० |

खालील संकेतस्थळावर ई- निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

१. https://mahapwd.com
२. https:// mahatenders.gov.in (सदर निविदासुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, ठाणे विघुत विभाग, सा.बां.विभाग, सा.बा. परिसर,ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ कार्यालयातील सुचना फलक.
४. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये योग्य त्या वर्गातील नोंदणीधारक (वर्ग -अ) विघुत अनुज्ञाप्तीधारक ठेकेदार तत्सत काम यशस्वीपणे पुर्ण केलेले अनुभवी कंत्राटदार वरील नोंदीप्रमाणे ई-निविदा सादर करु शकतात.

सही/-
**(प्र.अ. दोडे)**
कार्यकारी अभियंता (विघुत)
ठाणे विघुत विभाग, सा.बां.विभाग, ठाणे

**जिमाका/पालघर/जाहिरात १३/३७४/२०२० दिनांकः २५/०८/२०२०**



**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, जि. पालघर**

**(पुरवठा शाखा)**

क्र.पुरवठा/टे-२/राभादु/जाहीरनामा/कावि-४३४/२०२० दिनांक : २६/०८/२०२०

**जाहीरनामा**

प्रपत्र-अ

| | |
|---|---|
| जाहीरनामा ज्या प्रकारच्या दुकान परवान्यासाठी आहे तो परवाना प्रकार - | रास्तभाव धान्य दुकान |
| अर्ज कोणत्या तहसीलदार यांचेकडे सादर करणेचा त्या तहसील कार्यालयाचे नाव व पत्ता तसेच जाहीरनाम्याशी संबंधीत तालुका | तहसीलदार वसई |
| अर्ज सादर करण्याची मुदत - | दिनांक : ०२/०९/२०२० ते दिनांक : ०१/१०/२०२० पर्यंत |

वसई तालुक्यातील रिक्त व नव्याने मंजूर करावयाच्या रास्तभाव दुकानांची गावे खालीलप्रमाणे -

प्रपत्र - ब तालुका - वसई

| अ.क्र. | गावाचे नाव | ऑनलाईन दुकान क्रमांक | अ.क्र. | गावाचे नाव | ऑनलाईन दुकान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | नाळा | १६४६२३८००००४ | २. | देवतलाव (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६२३ |
| ३. | ससुनवघर (फेर जाहीरनामा) | १६४६२३८०००२६ | ४. | होळी (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६३० |
| ५. | किरवली (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६३७ | ६. | कळंब (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६७० |
| ७. | भालीवली (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६८१ | ८. | मेढे (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६८९ |
| ९. | तरखड (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००७४० | १०. | पाली | १६४६२३८००७४८ |
| ११. | पाणजू | १६४६२३८००७४९ | १२. | विरार (प.) | १६४६२३८००७९४ |
| १३. | विरार (प.) | १६४६२३८००७९५ | १४. | कोल्ही (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००७९७ |
| १५. | तामतलाव (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००८२६ | १६. | कोळीवाडा | १६४६२३८००७७४ |
| १७. | चिखलडोंगरे | | १८. | परेरानगर | |

**सही/-**
**जिल्हा पुरवठा अधिकारी**
**पालघर**


साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com
9890718873



# विद्युत वाहक तार पडल्याने युवक गंभीर जखमी

**वाडा/प्रतिनिधी**

तालुक्यातील नारे गावातील तरुण सकाळच्या सुमारास सौचास बाहेर गेला असता विद्युत वाहक तार अंगावर पडल्याने गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नारे गावाच्या हद्दीत असलेल्या आमंत्रण हॉटेल समोर राहणारा दशरथ सुरेश बागरा (वय १८) हा शनिवारी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास हॉटेलच्या पाठीमागे सौचासाठी गेला होता, तेथून परत येत असताना त्यांच्या अंगावर अचानक विद्युत वाहक तार पडली त्या धक्क्याने दशरथ हा बाजूला असलेल्या पाण्यात पडला त्याच्या सोबत असलेल्या लहान मुलाने हा प्रकार घरी सांगितला असता नातेवाईकांनी येऊन ती तार काठीने लांब करून सुभाष यास कुडूस येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले व तेथे प्राथमिक उपचार करून वाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असून त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

# पालघर जिल्ह्यामधील राज्यशासकीय सेवानिवृत्ती धारकांसाठी विशेष सुचना

**पालघर/प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी केंद्र सरकारच्या आयकर विभागाने आयकर वसुलीचे नवीन नियम ११५ BC नुसार आयकर गणनेसाठी Old Tax Regime व New Tax Regime असे दोन प्रकार निश्चित केलेले आहे. या दोनपैकी एक योग्य प्रकार निवृत्तीवेतन धारकांनी निवडावा या करीता आवश्यक असल्यास आपल्या नजीकच्या सनदी लेखापालांची मदत घ्यावी, निवृत्तीधारकांनी निवडलेला विकल्प to.palgharzillamahakosh.in या ईमेल आयडी वरुन निवृत्तीवेतन शाखा, जिल्हा कोषागार कार्यालय पालघर यांना दि. ३० सप्टेंबर २०२० पुर्वी कळवावा.

निवडलेल्या विकल्पाप्रमाणे निवृत्तीवेतनावर TDS कपात करण्यात येईल त्यानंतर तसे न कळवल्यास पुर्वीप्रमाणे Old Tax Regime मध्ये TDS कपात करण्यात येईल कृपया याची नोंद घ्यावी असे जिल्हा कोषागार अधिकारी पालघर यांनी कळविले आहे.

## पान १ वरून...

### पोलीस अधिक्षक सहीसलामत सटकले...

येथे जमावाच्या हल्ल्यात दोन साधू आणि त्यांचा वाहन चालक असे तिघे मारले गेलेच नसते. त्यामुळे केवळ कनिष्ठ पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करून चालणार नाही, तर त्यांच्या इतकेच किंबहुना त्याही पेक्षा अधिक जबाबदार असलेल्या पोलीस अधीक्षक गौरव सिंघ यांच्यावरही कारवाई व्हायला हवी असे इथल्या सामाजिक संघटनांचे म्हणणे आहे. पण कोणतीही मोठी घटना घडली कि कनिष्ठांचा बळी देवून वरिष्ठ मोकळे होतात. गडचिंचले हत्याकांड प्रकरणी सुद्धा तेच झाले आहे आणि हे अन्यायकारक आहे आणि अशाच अन्यायामुळे सर्व सामान्य पोलीस कर्मचाऱ्यांचे खच्चीकरण होत आहे आणि त्यातून पोलीस दलात असंतोष निर्माण झाला आहे. तेंव्हा या संपूर्ण प्रकरणाची गृहखात्याने स्वतंत्र चौकशी करून दोषी वरिष्ठ पोलीस अधिकार्यावरही कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. १६ एप्रिलच्या रात्री मुंबईवरून गुजरातकडे इको कारने निघालेल्या सुशील गिरी महारज (३५), कल्प वृक्ष गिरी महाराज (७०) आणि त्यांचा वाहन चालक निलेश तेलगडे (३०) अशा तिघांची मुले पळवणारे चोर समजून संतप्त जमावाने लाठ्या काठ्या आणि दगडांनी ठेचून हत्या केली होती. कारण काही दिवसांपासून या भागातील गावांमध्ये साधू आणि डॉक्टरांच्या वेशात मुले पळवणारी टोळी येणार आहे अशी अफवा पसरली होती. त्यामुळे गावकरी एकत्र जमून गावाच्या वेशीवर पहारा द्यायचे आणि याच गावकऱ्यांच्या तावडीत ते साधू सापडले. मात्र या घटनेची माहिती कसा पोलीस ठाण्याचे प्रभारी आनंद काळे यांना समजताच ते उप निरीक्षक काटारे तसेच काही पोलीस आणि जिल्हा परिषद सदस्य काशिनाथ चौधरी यांच्यासह घटनास्थळी पोहचले आणि त्यांनी जमावाच्या तावडीतून साधू आणि त्यांच्या वाहन चालकाला सोडवण्याचा प्रयत्न केला. पण जमाव त्यांचे काहीच ऐकत नव्हता. बरे तेथे पोलिसांचे संख्याबळ कमी असल्याने पोलीस जमावाला रोखू शकत नव्हते. अखेर पोलिसांच्या समोरच संतप्त जमावे दोन साधू आणि त्यांच्या वाहन चालकाची हत्या केली. त्यानंतर या घटनेची माहिती जिल्हा पोलीस मुख्यालयाला कळवण्यात आली आणि एक वाजता ज्यादा पोलीस बंदोबस्त घटनास्थळी दाखल झाला. या घटनेने संपूर्ण देश हादरला. पोलिसांवर टीकेची झोड सुरु झाली. पोलिसांनी आरोपींच्या शोधात चार पथके तयार केली आणि ११० जणांना अटक केली. याप्रकरणी सुरवातीला कासा पोलीस ठाण्याचे प्रभारी आनंद काळे यांच्यासह ६ पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आणि हे प्रकरण सीआयडीकडे सोपवण्यात आले. सध्या सीआयडीकडे तपास आहे आणि याच तपासा दरम्यान १८ पोलीस कर्मचाऱ्यांना या प्रकरणी दोषी धरून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. कासा पोलीस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी अधिकारी आनद काळे यांना पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात आले. तर उप निरीक्षक कटारे यांना उप निरीक्षक पदाच्या वेतन श्रेणीतील मुळ वेतनावर २ वर्ष ठेवले जाणार आहे.

कासाचे तत्कालीन सहा. फौजदार साळुंखे यांना सक्तीची सेवानिवृत्ती देण्यात आली. तत्कालीन कसा पोलीस ठाण्याचे पो.हवालदार नरेश धोंडी यांना सक्तीची सेवा निवृत्तीची शिक्षा देण्यात आली. हवालदार मुकणे यांना हवालदार पदाच्या मुळ वेतनावर २ वर्ष ठेवले जाणार आहे. पोलीस मुख्यालयातील पो.शि. शशिकांत कदम, सुरज कांदे, मनोज सहारे यांना पोलीस शिपाई पदाच्या मुळ वेतनश्रेणीतील मुळ वेतनावर १ वर्ष काम करावे लागणार आहे. तसेच पोलीस मुख्यालयातील बाबासाहेब जगताप, अक्षय पऱ्हाडे, आकाश आरक, गणेश घायास, अमितकुमार जाधव, कमलाकर पाटील, सुरज होवाळे, इस्राईल सय्यद, राहुल पंडागळे, श्रीराम फाजगे यांना यांना पोलीस शिपाई पदाच्या मुळ वेतनश्रेणीतील मुळ वेतनावर ३ वर्ष काम करावे लागणार आहे. मात्र तत्कालीन पोलीस अधीक्षक गौरव सिंघ यांची केवळ बदली करण्यात आली. पण पोलीस मुख्यालयातील त्यांच्या बड्या सहकाऱ्यांवर कारवाई झाली नाही हा एक प्रकारे अन्याय आहे. साधूंच्या हत्याकांडापुर्वी दोन दिवस अगोदर म्हणजे १४ एप्रिल रोजी अशाच अफवेमुळे त्या भागातील प्रसिद्ध डॉक्टर विश्वनाथ वाळवी यांच्यावरही जमावाने असाच हल्ला करण्यात आला होता. मात्र पोलिसांमुळे ते बचावले. अफवांमुळे अशा घटना त्या भागात घडत असतील तर जिल्हा पोलीस प्रशासनाने आणि खास करून पोलीस अधीक्षकाने हे प्रकार थांबवण्यासाठी आवश्यक ती कारवाई करायला हवी होती. पण ते बेफिकीर राहिले आणि त्यांच्या बेफिकिरीच्या चुकीची शिक्षा बिचाऱ्या १८ पोलीस कर्मचाऱ्यांना भोगावी लागत आहे.

### कानाखाली मारल्याने संतापाने पेटला...

त्या जोशात तो कधीकधी आपले होश विसरुन जात असे. जरा काही मनाविरुद्ध झाले म्हणजे तो संबंधीताच्या अंगावर देखील धावून जात असे. विलास चौधरी हा भुसावळ शहरातील श्रीराम नगर भागात रहात होता. अक्षय न्हावकर, अभिषेक शर्मा हे दोघे तरुण देखील त्याच परिसरात रहात होते. तिघेही जण एकदम तरुण होते. तिघांच्याही अंगात सळसळणारे रक्त ओसंडून वहात होते. २२ ऑगस्ट रोजी विलास रहात असलेल्या श्रीराम नगर भागातून अक्षय प्रताप न्हावकर व अभिषेक राजेश शर्मा हे दोघे तरुण त्यांच्या ताब्यातील मोटार सायकलने जात होते. त्यावेळी त्यांच्या ताब्यातील मोटार सायकलचा कट विलास यास लागला. आपल्याला मोटारसायकलचा कट कसा लागला? या मुद्द्यावरुन विलासने अक्षय व अभिषेक या दोघा तरुणांसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. या वादातून तिघा तरुणांमधे निकृष्ट दर्जाची शेरेबाजी आणि संवाद सुरु झाले. तिघांच्याही अंगात तरुण रक्त सळसळ करत होते. दुचाकीचा कट लागल्यामुळे विलासचा इगो अर्थात अहंभाव दुखावला होता. तरुणपणात हा इगो लवकर जन्माला येतो. त्याला विलास देखील अपवाद नव्हता. तिघा तरुणांमधे सुरु असलेल्या निकृष्ट दर्जाच्या संवादा दरम्यान विलासने संतापाच्या भरात अभिषेक शर्मा याच्या कानशिलात लगावली. विलासच्या हातून कानशिलात बसल्यामुळे अभिषेक शर्मा यास काही वेळ सुचलेच नाही. त्याच्या डोळ्यासमोर काजवे चमकू लागले. त्याचा कान आणि मन बधीर झाले. त्याला काही सुचेनासे झाले होते. मात्र कानशिलात बसल्यामुळे त्याच्यासोबत असलेल्या अक्षय न्हावकर याला देखील विलासबद्दल चिड निर्माण झाली. विलास हा गल्लीतील दादा असल्यामुळेच त्याने आपल्या कानशीलात लगावली असल्याचा समज अभिषेक शर्मा याचा झाला. कानशिलात लगावल्यानंतर तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी विलासने अभिषेक यास दिली होती. त्याच्या या धमकीमुळे अभिषेक सह अक्षय न्हावकर या दोघांना विलासने जणू काही आव्हान दिले होते. या आव्हानाला प्रति उत्तर देण्यास विलासने एकप्रकारे दोघांना प्रवृत्त केले होते. त्या दिवशी तो वाद कठीण संघर्षानंतर कसाबसा निपटला. घरी आल्यावर विलासने हा सर्व प्रकार घरी आई वडीलांना सांगितला. आपल्या मुलाला दोन समजुतीचे शब्द दिनकर चौधरी व आशाबाई चौधरी या दाम्पत्याने सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र तरुण रक्त असल्यामुळे आपल्या आईबापाचे अनुभवाचे बोल विलासने फारसे मनावर घेतले नाही. त्याने अक्षय व अभिषेक य दोघाना बघून घेण्याची भाषा सुरुच ठेवली.

अभिषेक शर्मा व अक्षय न्हावकर हे दोघे तरुण त्या दिवशी तेथून गेले खरे मात्र विलासचा बदला घ्यायचा हे मनाशी ठरवूनच. काहीही करुन विलासला कायमची अद्दल घडवायची हे दोघांनी मनाशी निश्चीत केले होते. अभिषेक शर्मा याने दरम्यानच्या काळात एका गावठी पिस्टलची व्यवस्था करुन ठेवली. अक्षय न्हावकर याने चाकूची व्यवस्था करुन ठेवली. २५ ऑगस्ट रोजी रात्री विलास यास अद्दल घडवण्याच्या दृष्टीने दोघांनी नियोजन सुरु केले. दोघांनी मिळून मयुरेश महाजन या तरुणास मदतीला घेतले. विलासच्या घरावर पाळत ठेवण्याची जबाबदारी दोघांनी मयुरेश याच्यावर सोपवली. विलास घरी केव्हा हजर आहे हे पाहण्याचे व तसा निरोप अक्षय व अभिषेक यांना देण्याचे काम मयुरेशवर आले होते. याकामी दोघांनी मिळून मयुरेश यास एक मोबाईल सोपवला होता. त्या मोबाईलच्या माध्यमातून संदेशाची देवाणघेवाण मयुरेश यास करायची होती. २५ ऑगस्ट रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास विलासचे आई वडील जेवण झाल्यानंतर टीव्ही बघत बसले होते. त्यावेळी विलास हा घराबाहेर सिमेंटच्या मोठ्या पाईपावर बसून मोबाईलवर गेम खेळत होता. त्यावेळी त्याच्यावर लक्ष ठेवण्याचे काम मयुरेश महाजन करत होता. विलास हजर असल्याचा संदेश मयुरेशच्या माध्यमातून अक्षय व अभिषेक यांना गेला होता. यावेळी तेथे त्यांचा मित्र आकाश पाटील हा देखील विलासच्या घराजवळ उभा होता. विलास घराबाहेर सिमेंटच्या पाईपावर बसला असल्याची माहिती मिळताच अभिषेक व अक्षय हे दोघे आपल्या हत्यारासह रात्री अकरा वाजता तेथे आले. अक्षयजवळ चाकू होता तर अभिषेक जवळ गावठी पिस्टल होते. अक्षय न्हावकर, अभिषेक शर्मा व आकाश पाटील यांनी एकत्र येत विलासवर हल्ला चढवला. अक्षय न्हावकर याने चाकूचे वार केले. अभिषेक व आकाश या दोघांनी मिळून विलास यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. एकाच वेळी तिघे मित्र आपल्यावर हल्ला करत असल्याचे बघून विलासने आरडाओरड करण्यास सुरुवात केली. त्याने घरातील आपल्या आईवडीलांना जोरात आवाज दिला. विलासचा आवाज ऐकून त्याचे आई वडील धावतच बाहेर आले.

विलासचे आई वडील बाहेर येताच जिव वाचवण्यासाठी विलास घरात पळत गेला. घरात प्रवेश केल्यानंतर लागलीच त्याने आतून दरवाजा बंद केला. त्याच्या मागेमागे अक्षय न्हावकर व अभिषेक शर्मा पळत आले. त्यावेळी घराच्या बाहेर आकाश पाटील उभा होता. विलासने घराचा दरवाजा आतून बंद केल्यामुळे तिघे तरुण तेथून निघून गेले. तिघे जण निघून गेल्यानंतर त्याच्या आईवडीलांनी त्याला दरवाजा उघडण्यास सांगितले. आईवडीलांचा आवाज ऐकून त्याने आतून दरवाजा उघडला. आईवडील आत येताच त्याने लागलीच दरवाजा पुन्हा लावून घेतला. विलास यास आतील खोलीत नेवून पाहिले असता त्याच्या दोन्ही हातावर व दंडावर जखमा झालेल्या होत्या. त्या जखमांमधून रक्त निघत होते. त्याच्या हातातून निघत असलेले रक्त थांबण्यास तयार नव्हते. त्यामुळे त्याच्या आईने त्याच्या हातावर पट्ट्या बांधण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. अक्षय न्हावकर याने आपल्यावर चाकूने तर अभिषेक शर्मा व आकाश पाटील यांनी लाथाबुक्क्यांनी वार केल्याचे विलासने त्याच्या आईवडीलांना सांगितले. जखमी विलासने तशाच अवस्थेत त्याच्या मोबाईलवरुन भुसावळ बाजारपेठ पोलिस स्टेशनसह मित्रांना या घटनेची माहिती दिली. दरम्यान घराच्या किचनच्या दरवाजावर हल्लेखोरांनी दगड फेकून मारण्यास सुरुवात केली. भितीपोटी विलास व त्याच्या आईवडीलांनी मधल्या खोलीचा दरवाजा देखील बंद करुन घेतला. मात्र हल्लेखोरांनी किचनच्या दरवाज्याची खालची फळी तोडून बळजबरी आत अर्धवट प्रवेश केला. तिघा तरुणांनी दरवाजा लोटून आत येण्याचा प्रयत्न केला. अर्धवट उघड्या दरवाज्यातून अभिषेक शर्मा याने त्याच्या हातातील गावठी पिस्टलमधून विलासच्या दिशेने गोळी झाडली. ती गोळी विलासच्या छातीवर बसली. मुलगा मेला मुलगा मेला असे त्याचे आई-वडील जोरजोरात ओरडू लागले. त्यामुळे घाबरुन सर्व हल्लेखोर पळून गेले. घरात मात्र रक्ताचा सडा पडला होता. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन राठोड व पोलिस निरिक्षक दिलीप भागवत यांनी घटनास्थळावर धाव घेतली. दरम्यान जखमी विलास यास तात्काळ ॲम्ब्युलन्स बोलावून डॉ. मानवतकर यांच्या दवाखान्यात नेण्याची व्यवस्था करण्यात आली. मात्र वाटेतच जखमी विलासने आपले प्राण सोडले होते. डॉक्टरांनी त्यास मयत घोषित केले. या प्रकरणी दिनकर लक्ष्मण चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार भुसावळ बाजारपेठ पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ८००/२० भा.द.वि. ३०२, ३२३, ,३४ आर्म ॲक्ट ३/२५, ३/२७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा अभिषेक शर्मा, अक्षय न्हावकर व आकाश पाटील यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर घटनास्थळाला अप्पर पोलिस अधिक्षक भाग्यश्री नवटके यांनी भेट देवून तपासकामी अधिकारी वर्गाला योग्य त्या सुचना दिल्या. पोलिस उपविभागीय अधिकारी गजानन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. दिलीप भागवत व त्यांचे सहकारी सहायक पोलिस निरिक्षक अनिल मोरे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यास सुरुवात केली. या गुन्हयाचा तपास सहायक पोलिस निरिक्षक अनिल मोरे यांच्याकडे सोपवण्यात आला. स.पो.नि. अनिल मोरे यांनी आपले सहकारी पोलिस नाईक समाधान पाटील, पोलिस नाईक रविंद्र बि-हाडे, पो.कॉ. विकास सातदिवे यांच्या मदतीने तपासाला सुरुवात केली. क्रमाक्रमाने अभिषेक शर्मा,अक्षय न्हावकर, आकाश पाटील यांना ताब्यात घेत अटक करण्यात आली. त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. त्यांनी दिलेल्या जवाबात विशाल टाक व मयुरेश महाजन यांची नावे पुढे आली. अभिषेक शर्मा याने विशाल टाक याच्याकडून गावठी पिस्टल विकत घेतले होते. त्यामुळे विशाल टाक याला देखील संशयीत आरोपी करण्यात आले. गुन्हा घडण्याच्या वेळी मयुरेश महाजन हा मयत विलासवर पाळत ठेवून होता. त्याने मोबाईलच्या माध्यमातून हल्लेखोर अक्षय व अभिषेक यांना माहिती दिल्यामुळे त्याला देखील संशयीत आरोपी करण्यात आले. अभिषेक याने त्याच्या ताब्यातील मोबाईल पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने विहिरीत टाकून दिले होते. अभिषेक शर्मा यास विशाल टाक याने दिलेले गावठी पिस्टल एका ट्रक चालकाकडून घेतले असल्याचे सांगण्यात आले. हे पिस्टल तपासात चमेली नगर नजीक रेल्वे लाईनच्या बाजूला ठेवलेल्या रेल्वेच्या स्लीपर मधून जप्त करण्यात आले. अक्षय न्हावकर याने गुन्हयात वापरेलेला चाकू शासकीय आयटीआय रेल्वे उड्डाणपूलाखालून जप्त करण्यात आला. गुन्हयात वापरलेले दोन मोबाईल विहीरीतून काढून जप्त करण्यात आले. अशा प्रकारे या गुन्हयाचा तपास पोलिस उप विभागीय अधिकारी गजानन राठोड व पोलिस निरिक्षक दिलीप भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. अनिल मोरे व त्यांचे सहकारी पोलिस नाईक समाधान पाटील, पोलिस नाईक रविंद्र बिऱ्हाडे, पो.कॉ. विकास सातदिवे यांनी पुर्ण केला. सर्व संशयित आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

### दारुड्यांच्या भांडणात विनाकारण...

त्यामुळे अलिकडे हा परिसर सेनसेटिव्ह म्हणून ओळखला जावु लागला आहे.सल्लाउद्दीन हा बायको आणि मुले यांच्यात रमणारा होता. हायवेवरती त्याचे स्क्रॅपचे दुकान असल्याने काकती येथील अनेक तरूणांची त्याची मैत्री जुळली होते. ते ही मित्र या नात्याने त्याच्याकडे येत होते. त्यांच्यात सर्व काही अलबेल चालले होते. परिसरातीलच अखिल मेत्री आणि अमर मैत्री यांच्याबरोबर चांगले सुर जमले होते. त्या दोघांची ही उठबस ही सल्लाउद्दीनच्या दुकानात होत होती.तेथेच त्यांचा पार्टीचा मेळ जमत होता. कधी कधी बाहेर ही पार्टया होत होत्या. सल्लाउद्दीन हा मुस्लीम गल्लीत राहत होता. त्यातच तो धर्माने मुस्लीम असल्याने व सध्या मोहरम सण असल्याने तो हा सण अत्यंत भक्तीभावाने साजरा करीत होता. या मोहरमच्या सणात त्याने मदपान करणे अतिशय कसोशीने टाळले होते. त्यातच गेल्या काही दिवसापूर्वी अमर मेत्री आणि अखिल मेत्री यांच्यात काही तरी कारणातून भांडणे होत होती. ते दोघे ही दारू पिऊन कुणाबरोबर ही क्षुल्लक कारणातून भांडणे काढत होते.तर कधी सल्लाउद्दीच्या स्क्रॅपच्या दुकानात बसून नको ते उपदयाप करीत होते.बऱ्याच वेळेला सल्लाउद्दीन याने त्या दोघांना माझ्या दुकानात बसून गैर काही करू नका. त्याचा परिणाम माझ्या व्यवसायावर होतो असे त्याना सांगितले होते. तरीही ते दोघे त्याचे काही ऐकत नव्हते.

सकाळपासून रात्रीपर्यत त्याच्या दुकानात पडून राहत होते. त्याच्या या सवयीमुळे सल्लाउद्दीन ही वैतागलेला होता.तरीही तो मित्र म्हणून त्याना समजावून घेत होता. यातून त्याची ही त्या दोघांबरोबर कधी तरी वादावादी होत होती. ते दोघे नशेत कायम असल्याने तो त्यांना जास्त काही बोलत नव्हता. तो त्यांना जवळचे मित्र मानत असल्याने सर्व काही सहन करीत होता. याचा ते वेगळाच अर्थ काढत होते. बऱ्याचवेळेला ते दोघे दारू पिलेले असल्याने सल्लाउद्दीनला ही दारू पिण्याचा ते आग्रह करीत होते. परंतु सल्लाउद्दीन हा कधी तरच त्याच्या मैफीलीत बसत होता. ते दोघे ही दारू पिण्यासाठी त्याच्या दुकानात येत असल्याने त्याच्याबरोबर ते अलिकडे इतर दोघां तिघांना ही घेऊन येत त्यामुळे सल्लाउद्दीनचे दुकान म्हणजे त्याच्या दारु पिण्याचा अड्डाच झाला होता. याचा राग सल्लाउद्दीनला येत होता. तो त्याना येथे माझ्या दुकानात दारु पिण्यास येऊ नका असे म्हणून त्याना सांगत होता. पण ते मात्र त्यालाच उलट मैत्री खातर शिव्या देऊन गप्प बसवित होते. एकप्रकारे ते त्याचा गैरफायदाच घेत होते.ते दारू पिऊन दुसऱ्याबरोबर विनाकरण भांडण काढतात हे सल्लाउद्दीन याला माहित असल्याने त्याने त्या दोघांना अलिकडे आपल्या दुकानात दारू पिण्यास मज्जाव केला होता.सुरूवातीला त्याने दिलेली भीड त्याला आता सलत होती.

गरूवार दि.२७ रोजी रात्री त्यांनी मनसोक्त दारू पिली होती.त्यावेळी त्याच्याबरोबर परशमरा इरगार आणि सुनिल बाळापगोळ हे दोघे ही होते. त्यांनी ही दारू ढोसली होती. रात्री ११.३०च्या दरम्याण सल्लाउद्दीन हा आपल्या गल्लीतील मोहरम सणांचा कार्यक्रम आटोपून आपल्या दुकानाकडे आला. जाताना त्याने दुकान बंद केलेले नसल्याने त्याला दुकान ही बंद करायचे होते.दुकान बंद करून तो सर्व्हिस रोडवरून मुस्लीम गल्लीतील आपल्या घराकडे जात असताना वाटेत त्याच्या दुकानाच्याजवळच सर्व्हिस रोडवर असणाऱ्या पेट्रोलपंपाजवळ अमर मेत्री आणि अखिल मेत्री हे कुणाबरोबर तरी वाद घालीत असल्याचे त्याला दिसले. त्याने जवळ जावून बघितले तर त्या दोघांच्याबरोबर काकतीलच सुनिल बाळापगोळ आणि परशराम इरगार हे दोघेजण होते. या दोघांनी ही दारू ढोसली होती. दारूच्या नशेत त्या चौघांत कशावरून तरी वाद विवाद आणि भांडण तंटा चाललेला होता. ते चौघे ही एकमेकांला शिव्या देऊन एकमेकांच्या अंगावर जात बघुन घेण्याची भाषा करीत होते. सल्लाउद्दीन त्याच्यजवळ गेला असल्याने त्याने कळत न कळतपणे त्याच्या भांडणात नाक खुपसले होते. तो त्याचे भांडण मिटविण्याचा प्रयत्न करीत होता. त्याचवेळी तो परशमराम आणि सुनिल यांची बाजू घेऊन बोलू लागला होता. त्या चौघात तू तू मैं मैं होत होती. चौघे ही एकमेकांच्या अंगावर जात होते. भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या सल्लाउद्दीनला त्यांनी बाजूला ढकलून दिले होते. तरीही तो चौघांना ही आपले मित्र मानत असल्याने त्याना समजावून सांगत होता. पण त्याच्यावर दारूचा अंमल जास्त झाला असल्याने नशेत तर्र असल्याने त्याना कशाचेच काही समजत नव्हते. नॅशनल हायवे वरती ही वाहनांची तुरळक वर्दळ चालु होती. हे पाचही जण सर्व्हिस रस्त्यावर असल्याने जाणाऱ्या वाहनांचे प्रखर हेडलाईट त्याच्या चेहऱ्यावर पडत होते. वाहने वेगाने जात असल्याने कुणी ही थांबत नव्हते. रस्त्यावर ही वर्दळ नव्हती. दुकाने ही आणि पेट्रोल पंप ही बंद झाला असल्याने त्याच्या भांडणाकडे लक्ष दयायला कुणी ही नव्हते. भांडणात सल्लाउद्दीन हा परशराम इरगर आणि सुनिल बाळापगोळ यांची बाजू घेऊन बोलू लागल्याने अखिल आणि अमर मेत्री याना त्याचा राग आलेला होते ते त्याला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ देत होते. आमच्या भांडणात पडू नकोस, तुला ही आम्ही बघुन घेऊ असे ते त्याला धमकावत होते. ते चौघेही दारुच्या नशेत असल्याने त्याचा कशाचा ताळमेळ लागत नव्हता. सल्लाउद्दीन हा त्यांची भांडणे मिटविण्यासाठी प्रयत्न करीत होता. पण ते कुणाचेच काही ऐकत नव्हते. एकमेकांच्या अंगावर जात होते. त्यातच अखिल मेत्री याने दारूच्या नशेत परशराम आणि सुनिल याना चाकूने मारण्याचा प्रयत्न केला होता. पण सल्लाउद्दीने त्याना अडविले होते. त्याचवेळी रागाच्या भरात असणाऱ्या मेत्री बंधुनी सल्लाउद्दीन याच्यावरच चाकुचे सपासप वार केले. त्याच्या डोक्यावर, मानेवर आणि छातीवर वर्मी घाव बसल्याने तो जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. हे बघुन त्या चौघांची ही पाचावर धारण बसली होती. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात सल्लाउद्दीन पडला असल्याने त्यांची दारूची नशा उतरली होती. तो गंभीर जख्मी अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याने त्याला तेथेच सोडून त्या चौघांनी घटनास्थळावरून पळ काढला.

कुणी तरी या घटनेची माहिती सल्लाउद्दीन याच्या घरच्या लोकांना दिल्याने त्याचे घरचे लोक आणि गल्लीतील लोक घटनास्थळी पळत आले होते. या घटनेची माहिती जवळजच असणाऱ्या काकती पोलीस स्टेशनला समजल्याने पोलीस ही घटनास्थळी दाखल झाले होते. पहिल्यांदा त्यांनी गंभीर जख्मी असलेल्या सल्लाउद्दीन याला जवळच्या खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. तेथे त्याच्यावर प्रथमउपचार करून पुढील उपचारासाठी बेळगाव येथील सिव्हिल हॉस्पिटलला नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला होता. त्याचा मुत्यु झाल्याने पोलीसांनी या घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून संशयीत आरोपीचा शोध घेण्यास सुरूवात केली.द् सऱ्या दिवशी घटनास्थळा शेजारी असणाऱ्या सीसीटिव्ही तपासले असताना या घटनेतील संशयीत आरोपी त्यात दिसत होती. ही घटना सीसीटिव्हीत कैद झाल्याने यातील आरोपीना पोलीसांना ओळखणे कठीण नव्हते. त्याचप्रमाणे पोलीसांनी या संशयीत आरोपींच्या मागावर आपले खबरे लावले असल्याने त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी शुक्रवार दि.२८ रोजी त्याना त्याच्या काकती येथील राहत्या घरातून ताब्यात घेतले होते. त्याच्याकडे पोलीस या घटनेची चौकशी करत असताना त्यांनी घडलेली सगळी घटना पोलीसांना सांगून आपला गुन्हा कबुल केला होता. या घटनेची फिर्याद मयत सल्लाउद्दीन याच्या पत्नीने काकती पोलीस स्टेशनला दिली असल्याने पोलीसांनी तिच्या फिर्यादीवरून सल्लाउद्दीन नजीरसाब पकाली (वय ३२) याच्या खूनप्रकरणी अखिल सिध्दाप्पा मेत्री (वय२७), अमर शाम मेत्री (वय २४),परशराम रामप्पा इरगार (वय २६) आणि सुनिल दयानंद बाळापगोळ (वय २७) रा.सर्व काकती जिल्हा बेळगाव यांच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदविला होता. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी त्याना बेळगाव येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता. मा.न्यायालयाने त्याना न्यायालयीन कोठडी सुनावली होती. पोलीसांनी त्यांच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला होता. या घटनेचा पुढील तपास काकती पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राघवेंद्र हळ्ळुर आणि त्याचे सहकारी करीत आहेत. दारूची नशा आणि होते जीवनाची दुर्दशा असे असल्याने कुणी ही त्यातून बोध घेत नाही. उलट पोटात आक्काबाई गेली की शेळीचा वाघ बनून समोरच्याला संपविण्याची भाषा केली जाते त्यातूनच भांडणात दारूच्या नशेत अनर्थ घडतो. म्हणूनच शहाण्या माणसाने दारुच्या नशेत असणाऱ्या बरोबर कसलाही व्यवहार करू नये किंवा त्याचे भांडण सोडविण्यास जावू नये. नाहीतर तेच भांडण त्याच्या अंगावर उलटण्यास वेळ लागत नाही. आणि त्यांच्याच जीवावर ते बेतु शकते हेच या घटनेतून दिसून येते.

### पत्नीच्या जीवनात आला एक यार...

वाघेला परिवार राहतो. सुरेश जग्या वाघेला (४६) याचा त्याची पत्नी जसु (३९) आणि मुलगी मोनिका (२३) या दोघीनी मिळून तुटलेल्या खिडकीची काच पोटात घुसवून गुरुवारी रात्री खून केला आहे. चार लाखांच्या चेकवरून आणि पत्नीचे इतर इसमासोबत अनैतिक संबंधाला विरोध या दोन्ही कारणावरून हत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. सुरेश यांच्या नातेवाईकाने तक्रार दिल्यावर शनिवारी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान चार लाखाच्या चेकवरून वाद असल्याने पतीचा पत्नी व मुलीने खून केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करून वसई न्यायालयात हजर केले असता सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, असे नालासोपारा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर माने यांनी सांगितले.

07 TO 13 SEPTEMBER 2020 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 05/09/2020 8:33 PM Page 1



# भिवंडी लोकसभा मतदारसंघाच्या ग्रामीण भागातही काँक्रीट रस्त्यांचे जाळे

## खासदार कपिल पाटील, किसन कथोरेंच्या प्रयत्नाने मंजुरी

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी लोकसभा मतदारसंघाच्या ग्रामीण भागातही काँक्रीट रस्त्याचे जाळे निर्माण केले जात असून, भाजपाचे खासदार कपिल पाटील व मुरबाडचे आमदार किसन कथोरे यांच्या प्रयत्नाने तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१८ मध्ये मंजूरी दिलेल्या कोट्यवधी रुपयांच्या काँक्रीट रस्त्यांच्या निविदा काढण्यात आल्या आहेत.



भिवंडी लोकसभा मतदारसंघाच्या विविध भागात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून काँक्रीट रस्ते उभारण्याची मागणी खासदार कपिल पाटील व आमदार किसन कथोरे यांनी २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन ग्रामविकास मंत्री पंकजा मुंढे यांच्याकडे केली होती. त्याचबरोबर रस्त्यांची नावेही सुचविली होती. या मागणीला मंजुरी देऊन, फडणवीस व पंकजा मुंढे यांनी सरकारी यंत्रणेला मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून अंमलबजावणीचे आदेश दिले होते. त्यानुसार कार्यवाहीला सुरुवात झाली होती. या रस्त्यांची पाहणी व आराखडा तयार केल्यानंतर अंतिम मंजुरीनंतर आता अंतिम निविदा काढण्यात आल्या आहेत. या रस्त्याचे काम जागतिक बँकेच्या निधीतून करण्यात येणार आहे. काँक्रीट रस्त्यांच्या कामांमुळे ग्रामस्थांनाही खड्डेमुक्त रस्त्यांवरुन प्रवास करता येईल. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित कंत्राटदाराला पाच वर्ष रस्त्याची निगाही राखावी लागणार आहे. काँक्रीट रस्त्यांबरोबरच कमी रहदारीच्या रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचा प्रस्तावही मंजूर झाला आहे. या प्रस्तावाला मंजुरी दिल्याने ग्रामस्थांना दिलासा मिळणार असून, या निर्णयाबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खासदार कपिल पाटील व आमदार किसन कथोरे यांनी आभार मानले आहेत.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर झालेली रस्त्यांची यादी पुढीलप्रमाणे आहे. भिवंडी तालुक्यातील पडघा बायपास रस्त्यासाठी ३ कोटी ७५ लाख, राज्य मार्ग ८२ (कासणे) ते खैरपाडा रस्त्यासाठी २ कोटी ३७ लाख, राज्य मार्ग ८४ निंबवली ते काशिवली (धामणगाव) रस्त्यासाठी १ कोटी २७ लाख, इतर जिल्हा मार्ग (एमडीआर) - १२९ ते ठाकऱ्याचा पाडा रस्त्यासाठी १ कोटी १८ लाख, राज्य मार्ग ८१ (देवळी) ते हरीपाडा रस्त्यासाठी १ कोटी ७३ लाख, सुरई ते भरोडी रस्त्यासाठी ८२ लाख, कल्याण तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्ग ४९ ते उतने चिंचवली रस्त्यासाठी ३ कोटी ९५ लाख, गेरसे ते कोसले रस्त्यासाठी १ कोटी ६ लाख, खडवली-वावेघर-ठाकूरपाडा रस्त्यासाठी १ कोटी ८८ लाख, टिटवाळा ते म्हसकळ रस्त्यासाठी १ कोटी ८९ लाख, मुरबाड तालुक्यातील राज्य मार्ग ७८ ते उंबरोली खुर्द बेंडारवाडी ते सिद्धेश्वरवाडी रस्त्यासाठी (कातकरीवाडी) २ कोटी, एमडीआर-७८ ते सोनावळे रोडसाठी १ कोटी ४० लाख, वेलपाडा (मासले) ते संतवाडी रस्त्यासाठी ८२ लाख, शहापूर तालुक्यातील कोशिंबडे ते पिवळी रोडसाठी ३ कोटी ४३ लाख, आंबरजे गोजरेश्वर मढ रोडसाठी २ कोटी ७५ लाख, एमडीआर-६२ ते कातकरीवाडी रस्त्यासाठी ३ कोटी २० लाख, भाभळे रस्त्यासाठी ९३ लाख, भावसे ते टहारपूर रस्त्यासाठी ९० लाख, राज्य मार्ग ७९ ते आखाड्याचापाडा रस्त्यासाठी ४५ लाख, राज्य मार्ग ७८ ते ढाकणे रस्त्यासाठी ८९ लाख, एमडीआर-६२ ते खरीवलीपाडा रस्त्यासाठी ८६ लाख, किन्हवली ते शीळ रस्त्यासाठी १ कोटी ७७ लाख, बाभळे जोड रस्त्यासाठी १ कोटी ९ लाख रुपयांची निविदा काढण्यात आली आहे.

# औसा नगर पालिकेचे माझी नगराध्यक्ष अँड. मुजीबोद्दीन पटेल यांचे निधन

**औसा/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्रख्यात कायदेपंडित तथा औशाचे माजी नगराध्यक्ष अॅड. मुजीबोद्दीन पटेल यांचे लातूर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले मृत्यूसमयी ते ८१ वर्षाचे होते. अॅड. मुजीबोद्दीन पटेल यांनी १९६४ मध्ये वकिली आणि सामाजिक कार्याची सुरुवात केली होती. राजकारण व समाजकारण करत आयुष्यभर औसा शहराच्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षितिजावर ते प्रकाशित राहिले. काँग्रेसच्या सत्तेत असताना त्यांना महाराष्ट्र राज्य हज कमिटी, मराठवाडा वक्फ बोर्डाचे सदस्यही म्हणून काम करण्याची संधी मिळाली होती. अॅड (वकीली) व्यवसायात आपली पकड निर्माण केले होते. त्यांनी औसा येथील आपल्या साथीदारांच्या मदतीने फखरुद्दीन अली अहमद एज्युकेशन सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने हजरत सूरत शाह उर्दू प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेची पायाभरणी करुन उर्दू शिक्षणाचे आयोजन केले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस व लातूर जिल्हा काँग्रेस च्या विविध पदांवर तसेच राजकीय पदावरही काम केले होते. औसा मतदारसंघातील विधानसभा निवडणुकीत दोनदा अत्यंत कमी मतांनी त्यांचा पराभव झाला होता. लातूर जिल्ह्यात आणि विशेषत: औसा शहरात शांतता व सुव्यवस्था पुनर्सचयित करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. आजपर्यंत टिकून



राहणारी उत्कृष्ट रणनीती त्यांनी स्वीकारली होती. आपल्या संयम व अत्यंत नम्र आणि आदरातिथ्य स्वभावामुळे परिचित होते. सर्वांशी हसत खेळत मन मिळावू स्वभाव हीच निती त्यांना भोवली व शहराचे १५ वर्षे नगराध्यक्ष म्हणून ओळख निर्माण झाली. त्यांनी सध्याच्या परिस्थितीवर सामाजिक राजकीय चर्चा करत होते. शहराच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी व नगरपालिकेच्या उत्पन्नाचे कायमस्वरूपी स्रोत वाढविण्यासाठी शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार केल्या. काँग्रेस राजकारणातील सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे चांगले संबंध होते. जनहितार्थ, शहरातील रस्ते, पथदिव्यांची कामे त्यांच्या कालावधीत झाली. होती त्यामुळे लोकांमध्ये लोकप्रियता वाढली. दिवंगत अॅड. मुजीबोद्दीन पटेल त्यांच्या पश्चात पत्नी, ७ मुले आणि विवाहित ३ मुली, सून व नातवंडे असा परिवार आहे.

# येणगेवाडीकरांची घर नमुना 'आठ अ' मिळण्याकरीता तहसीलदारांना निवेदन!

**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील येणगेवाडी हे गाव हे देवणी खुर्द गावच्या गायरान जागेत वसले असून येथे शासनाने रस्ते, पाणी, लाईट, शाळा, अंगणवाडी अशा महत्त्वाच्या सुविधा पुरवल्या आहेत. परंतु येथे वास्तव करुन राहणाऱ्या नागरिकांना आजपर्यंत अदयाप ग्रा.प. मिळकत रजिस्टर नमुना नं ८ देण्यात आलेले नाहीत. ग्रामस्थानी अनेक वेळा मागणी करुनही विचार झालेला नाही. शासनाने २०१८ मध्ये काढलेल्या परिपत्रका प्रमाणे सर्व लोक राहत असलेल्या जागेचा सर्वेही झालेला आहे . तेथील काही मोजक्याच कब्जेदार लोकांना ग्रा.प. च्या वतीने घरचा नमुना.नं ८ देवुन इतर लोकांवर अन्याय केलेला आहे.

यासाठी समस्त गावकरी व श्रमजिवी संघर्ष अभियान यांच्या संयुक्त निवेदनाने कोनालाही भेदभाव न करता समान न्याय तत्वावर सर्वानाच न्याय दयावा अशी मागणी एका लेखी निवेदनाद्वारे नागरीकांनी देवणीचे तहसीलदारांकडे केली आहे. या निवेदनावर अंकुश पाटील, भैय्यासाहेब देवणीकर, विजयकुमार सुर्यवंशी, भागवत वंगे, राम व्यंजने, राम माकणे, अजय गरड, आस्लम पठाण आदींसह इतर नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महापौर -उपमहापौरांची उपस्थितीत कोरोना बाधितांकडून गणरायाला निरोप



**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील समाज कल्याण भवन येथे लातूर मनपाच्या कोविड केअर सेंटरमध्ये कोरोनाबाधित रुग्णांनी स्थापन केलेल्या गणरायाला अनंत चतुर्दशी निमित्त आज मंगळवारी निरोप देण्यात आला. आवारातच गणेशाच्या इको फ्रेंडली मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. जगावर आलेले कोरोनाचे संकट विघ्नहर्त्या गणरायाने दूर करावे,अशी प्रार्थना तेथे उपचार घेणाऱ्या रुग्णांनी गणरायाकडे केली. विसर्जनावेळी महापौर विक्रांत गोजमगुंडे व उपमहापौर चंद्रकांत बिराजदार व कोरोना बधितांच्या हस्ते गणरायाची आरती करण्यात आली. श्री गणेश हा बुद्धिदाता आहे तसाच तो विघ्नहर्ता देखील आहे. आज जगावर कोरोनाचे संकट आले आहे. या संकटातून जगाला आणि मानवजातीला बरे करण्याच्या उद्देशाने कोरोनाबाधित रुग्णांनी समाज कल्याण विभागाच्या वसतिगृहात उभारण्यात आलेल्या कोविड केअर सेंटर मध्ये श्री गणेशाची स्थापना केली होती. गणेशाच्या आगमनाने बाधित रुग्णांना स्वतःच्या व्याधीचा काहीकाळ विसर पडला. दररोज सकाळ- सायंकाळ पूजा व आरतीमध्ये येथील रुग्ण रममाण होत असत. दरम्यानच्या काळात अनेक रुग्ण बरे होऊन घरी गेले तर काही नव्याने दाखलही झाले. परंतु पूजेचा नियम मोडला नाही. गणेश विसर्जना निमित्त मंगळवारी रुग्णांनी स्थापन केलेल्या पर्यावरण पूरक गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. महापौर विक्रांत गोजमगुंडे व उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी यावेळी उपस्थित रहावे असा आग्रह बाधित रुग्णांकडून करण्यात आला होता. महापौर विक्रांत गोजमगुंडे व उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी निमंत्रणाचा स्वीकार करत विसर्जनासाठी उपस्थिती दर्शवली. त्यांच्या उपस्थितीत विसर्जन करण्यात आले. लातुरसह जगातून कोरोनाचे बप्पाने विसर्जन करावे, अशी प्रार्थना महापौर व उपमहापौरांनी व कोरोना बाधितांनी यावेळी केली. कोविड केअर सेंटरमध्ये पर्यावरण पुरक गणेशाची स्थापना करण्यात आली होती. मोठ्या बादली मध्ये या मुर्तीचे विसर्जन करण्यात आले. बाधित रुग्णांनी या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.

# शेलार -मीठपाडा येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर नाम फलकाचे अनावरण



**भिवंडी/प्रतिनिधी**

तालुक्यातील शेलार ग्रामपंचायत हद्दीतील मिठपाडा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर नाम फलकाचे उदघाटन स्थानिक नागरिकांकडून करण्यात आले आहे.अनेक वर्षापासून येथील रहिवाशांची मागणी होती की या भागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे. यासाठी स्थानिक युवकांकडून शेलार ग्रामपंचायतीकडे मागील वर्षीही मागणी करण्यात आली होती. या ठिकाणी स्वागत कमान ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने असावी परंतू यश मिळत नव्हते. मात्र युवा वर्गाने पुढाकार घेऊन मीठपाडा या ठिकाणी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर फलकाचे उदघाटन करण्यात आले. लवकरच स्थानिकांकडून या भागात स्वागत कमान देखील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने उभारण्यात येणार असल्याचे स्थानिक आंबेडकरी युवा कार्यकर्ता मोनिश गायकवाड यांनी सांगितले. यावेळी स्थानिक युवक दिनेश जाधव, दशरथ जाधव, मुकेश, जाधव, निखिल उबाळे, शैलेश वाघमारे, अमोल भोईर, आकाश साळुंखे, गणेश जाधव, प्रदीप गायकवाड, रुपेश जाधव, गुरुनाथ बावडेकर, निमेश शेलार आदींनी विशेष मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला आहे.

# महापालिकेच्या रॅपिड, अँटीजेन चाचण्या सुरळीत

**लातूर - प्रतिनिधी,** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील कोरोना संसर्ग कमी करण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या चाचणी मोहिमेअंतर्गत नागरिकांनी शहरातील पाचपैकी एखाद्या केंद्रावर जाऊन तपासण्या करून घ्याव्यात, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. महापालिकेच्यावतीने तपासण्यांसाठी शहरात पाच केंद्र सुरू करण्यात आलेली आहेत. या केंद्रावर रॅपिड अँटीजेन चाचण्या केल्या जातात.याचा अहवाल १५ मिनिटात प्राप्त होतो.या चाचण्यांसाठी आवश्यक आवश्यक असणारे तढच् व -छढखत्रऋछ (अँटीजेन) कीट पालिकेकडे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. चाचण्याही सुरळीतपणे सुरू आहेत. ज्या नागरिकांना थंडी- ताप, सर्दी, खोकला,दम लागणे यासारखी कोरोनाची लक्षणे दिसत आहेत फक्त त्यांनीच शहरातील पाच पैकी एखाद्या केंद्रावर जाऊन आपली चाचणी करून घ्यावी.तसेच समाजकल्याण व पुरणमल लाहोटी कोवीड केअर सेंटर या ठिकाणी आरटीपीसीआर चाचणीसाठी केवळ स्वॅब जमा करण्याचे काम पालिकेकडून केले जाते. जमा केलेले स्वॅब विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तपासणीसाठी पाठवले जातात. दुसरे दिवशी त्याचा अहवाल प्राप्त होतो. तरी नागरिकांनी वेळीच तपासणी करावी असे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्हयातील शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थींनी इंडिया पोस्ट पेमेंण्टस बॅकेमध्ये खाते उघडून घ्याव

**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय डाक विभाग व इंडिया पोस्ट पेमेंण्टस बॅक यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी ज्यांचे बँक खाते नाही किंवा बॅक खाते हे आधार क्रमांकाशी संलग्नीत नाही अशा विद्यार्थांची शिष्यवृत्ती अद्याप बँक खात्यामध्ये जमा झालेली नाही. जिल्हयातील सुमारे ३.७ लाख विद्यार्थ्यांसाठी इंडिया पोस्ट पेमेंण्टस बँकद्वारे खास अकांऊट उघडण्याची मोहिम सुरु करण्यात आलेली आहे. जिल्हयातील शिष्यवृत्ती लाभापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांनी इंडिया पोस्ट पेमेंटस बॅके मध्ये खाते उघडून आधार नंबरशी संलग्नीत करुन दिले जाणार आहेत. त्याअनुषंगाने डाकघर अधिक्षक, बी. रवि कुमार, उस्मानाबाद डाक विभाग, मुख्यालय लातूर यांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी सदर सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# एम.सी.व्ही.सी.व व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम प्रवेशास सुरुवात

**लातूर:** शासकीय तंत्र प्रशाला केंद्र लातूर येथे इ. ११ वी एम.सी.व्ही.सी व व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रवेशास सुरुवात झालेली असून इ. १० उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेण्यास संपर्क करत आहेत. शासकीय तंत्र प्रशाला केंद्र क्रीडा संकूल जवळ, लातूर या संस्थेत एम.सी.व्ही.सी.शाखेचे इलेक्ट्रिकल टेकनॉलॉजी,ऑटोमोबाईल टेकनॉलॉजी व मेकॅनिकल टेकनॉलॉजी हे व्यवसाय अभ्यासक्रम तसेच व्दिलक्षी शाखेचे इलेक्ट्रिकल मेंटेनन्स, मेकॅनिकल मेंटेनन्स व जनरल सिव्हिल इंजिनीयरिंग इ. व्यवसाय अभ्यासक्रम सुरु असून सदर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पॉलीटेकनिकच्या द्वतीय वर्षास थेट प्रवेश, रोजगार व स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असून मागील वर्षाचे अनेक विदयार्थी नामांकित आस्थापनेवर कार्यरत तसेच उच्च शिक्षण घेत आहेत. सदर अभ्यासक्रम प्रवेश घेण्यासाठी प्रवेश प्रमुख कवलेकर एस.आर.(९४२२९६८३५४), स्वामी एम.एस (८४२१४४५५७८) व माने एस.एस ( ९७६५२२६६११) यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन संस्थेचे मुख्याध्यापक औताडे पी.जे. यांनी केले आहे.

# भिवंडीत प्रधानमंत्री स्वनिधी आत्मनिर्भर योजनेचा लाभ राष्ट्रीयकृत बँकांनी लाभधारकांना उपलब्ध करावा -आयुक्त डॉ.पंकज आशिया

**भिवंडी/प्रतिनिधी**

प्रधानमंत्री स्व:आत्मनिर्भर योजनेचा लाभ सर्व राष्ट्रीयकृत बँकांनी लाभ धारकांना उपलब्ध करण्यासाठी सहकार्य करून दहा हजार रुपये कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी किरकोळ फेरीवाल्यांना सहकार्य करावे असे आवाहन पालिका आयुक्त डॉ.पंकज आशिया यांनी बँक व्यवस्थापक यांच्या बैठकीत केले. पंतप्रधान स्व:निधी योजना यशस्वपणे राबवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका व सहकारी बँका आदींच्या व्यवस्थापकांची बैठक गुरुवारी पालिका सभागृहात घेण्यात आली. त्यावेळी पालिका आयुक्त डॉ. आशिया यांनी आवाहन केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, मुख्यालय उपायुक्त डॉ.दीपक सावंत, नूतन खाडे व शहरातील सर्व राष्ट्रीय बँक यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी सर्व बँक व्यवस्थापक यांना आवाहन केले की लॉकडाऊनच्या काळात किरकोळ फेरीवाले विक्रेते यांचे फार मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे. अशा किरकोळ फेरीवाले विक्रेत्यांना तातडीने आर्थिक मदत करून त्यांना मदतीचा हात देणे आवश्यक आहे त्याकरिता पंतप्रधान स्व:निधी योजना केंद्र सरकारने लागू केली आहे. या योजनेअंतर्गत किरकोळ फेरीवाले विक्रेते यांना रक्कम रुपये १० हजार कर्ज स्वरूपात उपलब्ध केले जाणार आहेत. सदर योजनेत किरकोळ फेरीवाले यांनी ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे. सदर अर्ज आपल्या नजीकच्या बँकेतून राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेत सादर केल्यानंतर कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. किरकोळ फेरीवाले यांनी ऑनलाईन अर्ज करावेत. याकामी काही अडचणी असल्यास पालिकेच्या मार्केट विभाग प्रमुख किंवा मुख्यालयातील राष्ट्रीय नागरी रोजगार अभियान येथे संपर्क साधावा. या योजनेत आजपर्यंत ऑनलाईन १,३३४ फेरीवाल्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. ५०४ फेरीवाले यांना महानगरपालिकेतर्फे प्राधिकृत पत्र देण्यात आले आहे व त्यांचे अर्ज बँकेकडे वर्ग करण्यात आले आहेत. सदरची योजना राष्ट्रीयकृत बँका व सहकारी बँका यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे तरी बँकांनी सदर पंतप्रधान स्व:निधी आत्मनिर्भर योजना सुरळीपणे राबवण्याकामी सहकार्य करावे असे आवाहन पालिका आयुक्त डॉ. पंकज आशिया यांनी सर्व बँक व्यवस्थापक यांना केले आहे.

# एक अविवाहित मुलीला तीन मुले; अकलूज पोलिसांनी लावला छडा

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात अनैतिक संबंधातून जन्माला आलेल्या स्वतः च्या तीन बालकांना बेकायदेशीररित्या दुसऱ्यांच्या ताब्यात दिल्याची तक्रार अकलूज येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी अविवाहित मुलीसह नऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी, एक अविवाहित मुलगी लग्न न करता तीन बालकांना जन्म देऊन त्यांची परस्पर विल्हेवाट लावल्याची तक्रार प्रमोद मिसाळ राहणार वाघोली ता माळशिरस जि सोलापूर यांनी अकलूज पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारी नुसार अकलूज पोलिसांनी तपास केला असता त्यांना ही मति गुंग होण्याची वेळ आली. सदर अविवाहित मुलीचे करमाळा येथील कालिदास पवार यांच्याशी अनैतिक संबंध जुळले. या संबंधातुन ती गरोदर राहिली त्यानंतर तिने २०१६ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील एका खाजगी हॉस्पिटलमध्ये एका मुलीला जन्म दिला. अनैतिक संबंधातून जन्मलेले हे बाळ जवळ बाळगणे अवघड असल्यामुळे त्या चिमुकल्या बाळाला कालिदास पवार व अश्विनी पवार यांनी केडगाव ता दौड जि पुणे येथील पंडिता रमाबाई मुक्ती मिशन या संस्थेला दत्तक दिले. त्यानंतर सदर अविवाहित मुलीला पुन्हा कालिदास पवार याच्याशी तिच्या मर्जीनेच शारीरिक सुख भोगण्याकरिता शारीरिक संबंध ठेवून २०१८ मध्ये अकलूज येथील एका खाजगी हॉस्पिटलमध्ये बालकाला जन्म दिला. जन्मलेले बाळ हॉस्पिटलमधील नर्स सुलोचना मोरे हिला बेकायदेशीरपणे दिली. त्यानंतर सुलोचना मोरे यांना कोणतेही अधिकार नसतांना तिने हे बाळ परस्पर दमयंती दिलीप कसबे व उलवंती दिलीप कसबे रा.पंचशील नगर अकलूज यांना दिले. त्यानंतर त्या अविवाहित मुलीने पुन्हा कालिदास पवार याच्याशी अनैतिक संबंध सुरु ठेवले व गेल्या २५ जुलै रोजी अकलूज येथील उप जिल्हा रुग्णालयात मुलाला जन्म दिला.

या रुग्णालयात भरती होताना तिने स्वतः चे नाव वैशाली रोहित जाधव असे सांगितले होते व जन्मलेले बाळ राणी रामलाल बंदपट्टे, अनिल बंदपट्टे व अनिलची बायको राहणार अकलूज यांच्याकडे सुपूर्द केले. प्रमोद मिसाळ यांनी दिलेल्या तक्रार अर्जावरून या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर सदर मुलीला पोलिसांनी अध्यक्ष महिला व बालकल्याण समिती सोलापूर यांच्यासमोर उभे केले. तेव्हा महिला व बालकल्याण समितीने तिन्ही बालकांचा शोध लावून समिती समोर उभे करण्याचे आदेश दिले. त्यानंतर सुरू झाला त्या तीन बालकांचा शोध, केडगाव येथील पंडिता रमाबाई मुक्ती मिशन यांच्याकडे पत्रव्यवहार करून चौकशी केली असता त्यांनी हे बालक पुढे दत्तक दिल्याचे सांगितले. तसेच २०१८ व २०२० साली जन्मलेले बाळ ताब्यात घेण्याकरिता सुलोचना मोरे, दमयंती दिलीप कसबे, उलवंती दिलीप कसबे, राणी बंदपट्टे, अनिल बंदपट्टे व त्याची पत्नी यांना शोधण्याचा प्रयत्न केला असता ते सापडले नाहीत. याबाबत सहाय्यक फौजदार महंमद हरून नायकवडी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपअधीक्षक नीरज राजगुरू व पोलीस निरीक्षक भगवान निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव मारकड, पोलीस उपनिरीक्षक सारिका शिंदे, सहाय्यक फौजदार महंमद नायकवडी, श्रीकांत निकम, हवालदार नाजमीन तांबोळी यांनी या प्रकरणाचा छडा लावला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव मारकड करीत आहेत.

# विरारच्या कारगिल नगर येथे शिधा वाटप दुकान सुरु करण्याची नगरसेवक प्रशांत राऊत यांची मागणी

**विरार/प्रतिनिधी**

विरार पुर्वेच्या मनवेल विभागातील नागरी वस्ती दिवसेंदिवस वाढत चालल्याने या भागात आणखी एक शिधावाटप दुकान सुरु करावे अशी मागणी बविआचे नगरसेवक तथा माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत यांनी वसई पुरवठा विभागाकडे केली आहे.



वसईच्या पुरवठा अधिकाऱ्यांना लिहलेल्या पत्रात प्रशांत राऊत यांनी म्हटले आहे कि मनवेलपाडा विभागात नाना-नानी पार्क व मनवेल पाडा तलाव, विवा जहांगीर कॉम्प्लेक्स येथे महाराष्ट्र शासनाची स्वस्त धान्य वाटप दुकाने असून मनवेलपाडा विभागातील नागरी वस्ती वाढल्यामुळे सदर दोन्ही दुकानांमध्ये धान्य घेण्यासाठी नागरिकांची प्रचंड गर्दी होते आणि लांबच लांब रांग लागतात आणि नागरिकांना धान्य मिळण्यास विलंब होतो, तर काही वेळेस वेळेअभावी धान्य मिळत नाही. म्हणूनच या प्रकरणी आपण जातीने लक्ष घालून कारगिल नगर व आसपास जास्त वस्ती झाल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे स्वस्त धान्य दुकान चालू करून कारगिल नगर मनवेलपाडा गाव परिसर येथील शिधापत्रिका नवीन दुकानात समाविष्ट कराव्यात जेणेकरून वाढीव दुकानामुळे नागरिकांची गैरसोय टाळू शकेल अशी विनंती या पत्रात पुरवठा अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे.

# भिवंडी तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागात अनागोंदी कारभार

## धान्य गैरव्यहाराच्या चौकशीची शिवसेनेची मागणी

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी तहसील कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या स्वस्त धान्य पुरवठा कार्यालयात मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार सुरू असून या कार्यालयातून नुतनीकरण अथवा नवीन रेशनिंग कार्डसाठी लागणारे फार्म हे दोन रुपयास विक्री केले जात आहेत. मात्र सदरच्या फार्मचे पैसे शासकीय ट्रेझरीत जमा केलेले नाहीत असा आरोप शिवसेना आमदार शांताराम मोरे यांनी केला आहे. तर कोरोनाच्या महामारीत नागरिकांना मोफत धान्य वाटप करण्याचे शासनाचे आदेश असताना आलेले धान्य काहींना मिळाले तर काही कार्ड धारकांना मिळाले नाही. मात्र शंभर टक्के धान्य वाटप केल्याचा अहवाल जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना पाठवण्यात आला आहे. या मोफत धान्य



वाटपात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे आरोप आमदार शांताराम मोरे यांनी केला आहे. या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी आमदार मोरे यांनी केली आहे.

भिवंडी तालुक्याच्या ग्रामीण भागात एकूण ६२ हजार ४८२ शिधापत्रिका धारक आहेत त्यापैकी ४४ हजार ७३८ कार्ड धारकांचे आधार कार्ड संगणीकरणास जोडले आहेत. त्यामुळे १७ हजार ७४४ कार्ड धारक कोरोनाच्या महामारीत शासनाच्या मोफत धान्यापासून वंचित राहिले आहेत, तर अधिकृत कार्ड धारकांकडे रेशनकार्ड असूनही बहुतांश रेशनकार्ड धारकांना धान्य मिळालेले नाही. तसेच काहींनी मोफत धान्य स्वतःहून घेतलेले नाही. त्यामुळे शासनाने दिलेल्या धान्यापैकी हजारो टन धान्य कोठे गेले? असा सवाल आमदार शांताराम मोरे यांनी उपस्थित केला आहे. तसेच सन २०१९ मध्ये सुमारे पाच हजार नवीन कार्ड बनविण्यात आले आहेत.

मात्र एका नवीन कार्डच्या अर्जाची किंमत दोन रुपये असताना सदरची रक्कम शासकीय ट्रेजरीत जमा केलेले नाहीत. त्यामुळे शासनाचे हे पैसे गेले कोठे? याची चौकशी करून संबंधितांवर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. या कार्यालयात शासकीय कर्मचाऱ्यांसोबतच खाजगी कर्मचारी देखील काम करीत असून नवीन रेशनिंग कार्ड दलालांमार्फतच तयार केले जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे भिवंडी तहसील कार्यालयातील या रेशनिंग अधिकाऱ्यांची चौकशी करून धान्य भ्रष्टाचारबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी शिवसेना आमदार शांताराम मोरे यांनी केली आहे.

# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गरजूंना मदतीचा हात



**वाडा/प्रतिनिधी**

कोरोनाच्या संकटामुळे अनेकांचे रोजगार हिरावले असून या कुटुंबांवर उपासमारीची वेळ ओढवली आहे. अशा संकटाच्या काळात अनेक परदेशी संस्था गरजू कुटुंबांना मदतीचा हात देत आहेत.

तैवानमधील 'त्झ्य'ची फाऊंडेशनने अखिल भारतीय मागासवर्गीय संस्थेच्या माध्यमातून वाड्यातील गरजू आदिवासी कुटुंबांना मंगळवारी अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तुंचे वाटप केले. याप्रसंगी अखिल भारतीय मागासवर्गीय संस्थेचे समीर गायकवाड, वंचित आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. सुनील भडांगे, सरचिटणीस सिताराम जाधव, युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष आतिश जाधव आदी उपस्थित होते. गेल्या सहा महिन्यांपासून कोरोनाच्या संकटामुळे देशभर लॉकडाऊन घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे असंघटित कामगारांच्या हाताला काम नाही. हातावर पोट असलेल्या ग्रामीण भागातील आदिवासी मजूरांवर रोजगार हिरावल्याने उपासमार ओढवल्याचं चित्र आहे. याची दखल घेऊन शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या अखिल भारतीय मागासवर्गीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी परदेशातील अनेक संस्थाना मदतीकरिता विनंती केली होती. यामध्ये विशेषतः संस्थेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना मदत व्हावी म्हणून आवाहन केले होते. त्यावर तैवानमधील त्झ्यू ची फाऊंडेशनने पुढे येत ठाणे व पालघर जिल्ह्यातील सुमारे एक हजारांहून अधिक आदिवासी कुटुंबांना अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

# भिवंडीतील प्रवाशी वाहतूक सुधारण्यासाठी आमदारांचे परिवहनमंत्र्यांना साकडे

**भिवंडी/प्रतिनिधी**

कामगार नगरी व दाटीवाटीचे शहर म्हणून भिवंडी शहराची देशभर ओळख आहे.यंत्रमाग उद्योग व गोदाम पट्ट्यामुळे येथे लोकसंख्या देखील झपाट्याने वाढली आहे. त्यातच अरुंद रस्ते व मर्यादित बस फेऱ्या यांमुळे भिवंडीकरांना इतर शहरांमध्ये प्रवास करण्यासाठी मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. नागरिकांच्या या समस्या लक्षात घेवून भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांची बुधवारी भेट घेतली व भिवंडीत एसटी बस फेऱ्या वाढविण्याची विनंती लेखी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात भिवंडीतील नागरिकांसाठी वाढीव बस फेऱ्या आणि सुधारित मार्ग, भिवंडी एसटी आगरराचे नूतनीकरण तसेच भिवंडीवासीयांच्या परिवहन सुविधांकरिता आरटीओ कॅम्प आयोजित करण्याबाबत परिवहनमंत्र्यांकडे मागणी केली आहे. आपल्या मागण्यांना परिवहन मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून शहराच्या वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेण्याकरिता परिवहन मंत्री स्वतः भिवंडी शहरास भेट देणार असल्याची माहिती आमदार रईस शेख यांनी दिली आहे.



# राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज यांना राज्यमंत्र्यांनी वाहिली श्रद्धांजली



**लातुर/प्रतिनिधी**

राष्ट्रसंत परमपूज्य डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांचे शिवक्य झाले. यानंतर महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी भक्ती स्थळ येथे जाऊन राष्ट्रसंत परमपूज्य डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांना श्रद्धांजली अर्पण केली. भारतीय संस्कृतीमध्ये जगाला उन्नत करण्याची ताकद आहे. या जगात संत आणि आध्यात्मिक गुरूंकडे जगाला दिशा दाखविण्याचे सामर्थ्य आहे. देशाला अभिमान वाटावा अशी ३९; गुरुमाऊली ३९; राष्ट्रसंत, वसुंधरारत्न परमपूज्य डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज होते. त्यांचे लिंगऐक्य झाले. त्यामुळे सांस्कृतिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्राचे अपार नुकसान झाले आहे. स्वार्थाच्या पलीकडे जाऊन गुरुमाऊलिंनी जगाच्या कल्याणाची काळजी केली. गुरूमाऊली डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज हे राष्ट्रसंत, जगदुरु होते. त्यांचे जगणे ते इतरांना मार्गदर्शक होते. त्यांच्या आदर्शांचे अनुकरण होणे गरजेचे आहे. त्यांचे आशीर्वाद मला मिळाले, वेळोवेळी मार्गदर्शन लाभले हे मी माझे भाग्य समजतो. आज त्यांच्या स्मृतीस महाराष्ट्र सरकार, तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे. अशा भावना व्यक्त केल्या. यावेळी राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या समवेत अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबासाहेब पाटील, शैलेश पाटील चाकूरकर, पोलीस उपविभागीय अधिकारी अश्रि्वनी शेलार, उपविभागीय अधिकारी महसूल प्रभोदय मुळे, तहसीलदार महेश सावंत, तहसीलदार शिवानंद बिडवे, पोलीस निरीक्षक पुजारी सुनील सह्याद्री हॉस्पिटलचे डॉ. हनुमंत किणीकर, बाजार समिती उदगीर सभापती सिध्देश्वर पाटील, उपस्थित होते.

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या रस्त्याची चार महिन्यातच दुरावस्था

**वाडा/प्रतिनिधी**

तालुक्यातील वाडा-मनोर राज्य महामार्ग ते सापणे गावापर्यंत २ किलोमीटरच्या रस्त्याचे काम मे महिन्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात आहे. मात्र ठेकेदाराच्या निकृष्ठ कामामुळे चार महिन्यातच हा रस्ता उखडू लागला असून रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडण्यास सुरवात झाली असल्याने या रस्त्याच्या गुणवत्तेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. वाडा-मनोर राज्यमहामार्गावरील सापणे फाटा ते सापणे बुद्रुक गाव हा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मे.शिवशाही कन्ट्रक्शन, पालघर या ठेकेदाराच्या माध्यमातून बनविण्यात आला असून २.३ किमी रस्त्यासाठी १ कोटी ९५ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. मे महिन्यात असलेल्या लॉकडाऊनमध्ये हा रस्ता बनविण्यात आला आहे. मात्र निकृष्ठ दर्जाच्या कामामुळे या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडण्यास सुरवात झाली आहे. शासनाने करोडो रुपये खर्च करूनही ठेकेदारांच्या निकृष्ठ काम आणि ठेकेदाराने वापरलेल्या निकृष्ठ डांबरीमुळे रस्त्याची लवकरच दुरावस्था होईल



अशी भीती ग्रामस्थ वेक्त करत आहेत.

मे २०२० मध्ये या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले. मात्र लॉकडाऊनची वेळ असल्याने या रस्त्यावर वाहनांची वर्दळ खूपच कमी होती. त्यामुळे रस्त्याची गुणवत्ता समजू शकली नव्हती मात्र पावसामुळळे तसेच बस आणि इतर गाड्या या रस्त्यावरून धावू लागल्याने अनेक ठिकाणी रस्ता फुटू लागला आहे. जर सुरवातीपासून या रस्त्यावरून बसेस आणि इतर वाहने धावत असती तर आत्तापर्यंत या रस्त्याची पूर्णपणे वाताहत झाली असती असे मत गावातील नागरिकांकडून वेक्त केले जात आहे.

ठेकेदाराच्या अशा निकृष्ठ कामांमुळे शासनाचे करोडो रुपये वाया जातात आणि याच त्रास नागरिकांना देखील होत असतो. खर तर हा रस्ता बनवून पाच वर्षे देखभाल करण्याची जबाबदारी देखील याच ठेकेदाराची आहे. मात्र एकदा रस्ता बनविल्यानंतर ठेकेदार कधीही त्या रस्त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष देत नसल्याचे अनेक ठिकाणी दिसून येत आहे. त्यामुळे या रस्त्याच्या गुणवत्तेची चौकशी करून निकृष्ठ काम करणाऱ्या सदर ठेकेदारावर कारवाई करून काळ्या यादीत टाकण्याची मागणी सापणे गावातील नागरिकांकडून होत आहे.

# शिकार केलेल्या काळविटाचं मटण खाणं पडलं महागात

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापुरात काळविटाची शिकार करणाऱ्या शिकाऱ्याकडून मटण विकत घेणे दोघांना चांगलेच महागात पडलं आहे. आता वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी दोघांना अटक करून त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. वन अधिनियमानुसार शिकार करणे किंवा त्याचे मटण खरेदी करणे कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे शिकाऱ्याकडून मटण घेणाऱ्यांना वनविभागाने अटक करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुतन्ना कोळी आणि विष्णू बनसोडे अशी आरोपींची नावं आहेत.



यापूर्वी शिकार केल्याप्रकरणी अनेक शिकाऱ्यांवर कारवाई झाली होती. मात्र, मटण विकत घेणाऱ्यांवर गुन्हा दाखल होण्याची महाराष्ट्रातील वन विभागाची ही पहिलीच कारवाई असल्याचं बोललं जात आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील संगदरी गावात तीन दिवसांपूर्वी आरोपी विजय भोसले या शिकाऱ्याला वनविभागाने काळविटाच्या मटणासह रंगेहाथ अटक केली होती. यावेळी आरोपीच्या घरात काळविटचं मांस, चारही पायाचे खूरं, कातड्याचे तुकडे, शिंगे, नायलॉन वायरचे फासे, कुऱ्हाड, सुरा, वागर, वजन काटा असं साहित्या जप्त करण्यात आलं होतं. त्यानंतर वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी इरशाद शेख यांनी अतिशय शिताफीने आरोपीचे कॉल रेकॉर्ड चेक करुन त्याच्याकडून ज्या व्यक्तींनी काळविटाचं मटण नेले, त्यांचा तपास केला. या तपासात दोन आरोपींचे कॉल रेकॉर्डिग अधिकाऱ्यांना मिळाले. त्यानुसार मुतन्ना कोळी आणि विष्णू बनसोडे या आरोपींना अटक करण्यात आली. अटकेनंतर दोघांना मे.कोर्टात हजर केलं असता मे.न्यायलयानं त्यांना ३ सप्टेंबरपर्यत वन कोठडी सुनावण्यात आली. दरम्यान या घटनेनंतर आणखी कोणी यामध्ये सामील आहे का? याचा देखील तपास वनविभागाचे अधिकारी करत आहेत.

दरम्यान, सोलापुरातील नेचर कॉन्झर्वेशन सर्कलला आलेल्या गोपनिय माहितीच्या आधारे नेचर कॉन्झर्वेशन सर्कल सोलापूर, जिल्हा पोलीस दल आणि वन विभाग सोलापूर यांच्या संयुक्त कारवाईतून हे काळवीट शिकार प्रकरण उघडकीस आलं आहे. संगदरी येथे काळवीटची शिकार करून त्याचे मांस विक्री होत असल्याची माहिती नेचर कॉन्झर्वेशन सर्कलला मिळाली. त्याची माहिती मिळताच त्यांनी पोलिस अधिक्षक मनोज पाटील यांना भ्रमणध्वनी वरून संपर्क साधून सदर घडलेल्या घटनेची माहिती दिली. पोलिस अधिक्षकांनी तात्काळ पोलिसांचे एक पथक नेचर कॉन्झर्वेशन सर्कल सोबत पाठवले. तसेच वन विभागाच्या काही कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन घटनास्थळी धाड टाकली असता काळविटाची शिकार झाल्याचे उघड झाले.

# अहमदपूर सुमठाणा येथील शेतकऱ्यांचा मावेजासाठी आमरण उपोषणाचा इशारा

**अहमदपूर/प्रतिनिधी**

अहमदपूर तालुक्यातील सुमठाणा येथील शेतकऱ्यांची जमीन उर्ध्व मनार उपसा जलसिंचन प्रकल्पा अंतर्गत कालव्यासाठी (कॅनॉल) बारा वर्षापूर्वी संपादीत करण्यात आली असून या संपादीत जमिनीचा अद्यापपर्यंत मावेजा मिळाला नाही. तो तात्तकाळ शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करावा अन्यथा तिव्र आंदोलन करण्याचा इशारा सुमठाणा येथील शेतकर्यांनी एका निवेदनातून उपविभागीय आधिकार्यांना दिला आहे. सविस्तर माहिती अशी की, उर्ध्व मनार उपसा सिंचन प्रकल्पा अंतर्गत कालव्या (कॅनॉलसाठी) बारा वर्षापूर्वी शेतकऱ्यांची जमिन संपादीत करण्यात आली आहे. मात्र या जमीनीचा अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना मावेजा मिळाला




नाही. त्यामूळे जमिनीचा मावेजा देण्यात यावा यासाठी ८ सप्टेंबर रोजी उपविभागीय कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच संबंधीत प्रकरणात शेतकऱ्यांची फसवणुक करणाऱ्या अधिकाऱ्यांना नोटीस का देण्यात आल्या नाहीत. जमीन ताबा प्रमाणपत्र का दिले गेले नाही.याचा जाब विचारून संबंधीत कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर गणेश पोले, बालासाहेब मुसळे, विलास मुसळे, मदन मुसळे, विश्वनाथ पोले, मल्हारी पोले, व्यंकटी पोले, गुणवंत मुसळे, संग्राम मुसळे, गणपती पोले, शशिकांत कुलकर्णी आदी शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गंभीर आजाराच्या रुग्णांना रेल्वे प्रवासाची परवानगी द्या

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई/प्रतिनिधी**

गंभीर आजाराच्या वैद्यकीय उपचारासाठी प्रवास कराव्या लागणाऱ्या रुग्णांना आणि त्यासारख्या नातेवाईकांना रेल्वेने प्रवास करण्याची परवानगी देण्यात यावी; अशी मागणी आग्रही मागणी मनसे नेते अमित ठाकरे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठवण्यात आलेल्या पत्रात अमित ठाकरे यांनी म्हटले आहे की, मागील सहा महिन्यांच्या करोना लॉकडाउनच्या कालावधीत क्षयरोग, कर्करोग, यकृत, मूत्रपिंड, मेंदूविकार, अर्धांगवायू, मधुमेहासारख्या गंभीर आजाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांना उपचार घेण्यासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. मागील सहा महिन्यात सर्वसामान्याची आर्थिक घडी विस्कटलेली आहे. अशातच या आजारांवरील उपचारांचा खर्च लाखोंच्या घरात असतो. सध्या रुग्णांना उपचाराबरोबरच प्रवास खर्चाला तोंड द्यावे लागत आहे. असे अनेक आजार आहेत ज्यांच्या उपचारासाठी रुग्णांना आठवड्यातून दोन-तीन वेळा प्रवास करावा लागतो.

सध्याची बिघडलेली आर्थिक परिस्थिती पाहता बहुतांश रुग्णांना खासगी वाहनाने प्रवास परवडत नाही. या खर्चामुळे अनेक रुग्ण उपचारापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे अशा रुग्णांचा मृत्यू दर करोनामुळे होणाऱ्या मृत्यूंपेक्षा अधिक होत चालला आहे. तसेच, गंभीर आजार असलेल्या रुग्णांना त्याच्या उपचारादरम्यान आधारासाठी सोबत नातेवाईकाची गरज असते. अशावेळी सर्वसामान्य रुग्णांना व त्याच्या नातेवाईकांना उपचारादरम्यान खासगी वाहनाने प्रवास परवडणं शक्य



नसल्याने त्यांना रेल्वेने प्रवासासाठी मुभा देणे गरजेचे आहे असे देखील म्हटले आहे. गंभीर वैद्यकीय उपचारांसाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना रेल्वे प्रवासासाठी परवानगी दिली जावी, या मनसेच्या आग्रही मागणीचा राज्य सरकार व रेल्वे प्रशासनाने मानवतेच्या दृष्टीने विचार करावा, अशी विनंती देखील पत्रात करण्यात आलेली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठवलेल्या या पत्राच्या प्रती मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वेच्या महाव्यवस्थापकांना देखील पाठवण्यात आलेल्या आहेत. पत्रावर मनसे नेते अमित ठाकरे यांची स्वाक्षरी आहे.